# माणूस

शनिवार । १३ जानेवारी १९७९ । ७५ पैसे

‘ चैनीच्या वस्तू आयात करण्याची परवानगी मिळावी ’ अशी मागणी पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरात, टिळक स्मारक ट्रस्टतर्फे झालेल्या दोन दिवसांच्या अर्थशास्त्रज्ञांच्या परिसंवादात एका नामवंत उद्योगपतींनी केली ! याच परिसंवादात आणखी एका औद्योगिक घराण्याचे प्रवक्ते-अर्थशास्त्रज्ञ म्हणाले : ‘ रशियात–परदेशात लिपस्टिकला मागणी असेल तर आपल्याकडे लिपस्टिकचे उत्पादन वाढवायला काय हरकत आहे ? यामुळेही आपला बेकारीचा–गरिबीचा प्रश्न सुटू शकेल ’ ...... वगैरे.

देशातील बड्या उद्योगधंद्यांचा हा मार्ग.....ही विचारसरणी.....

## या मार्गाने गरिबीचा-बेकारीचा प्रश्न सुटणार आहे का ?

गांधीजींचा तर सोडाच.

हा टिळकांचा तरी मार्ग आहे का ?

आशिया खंडातून पुढे आलेला पहिला लोकनेता असा ज्यांचा खुद्द लेनिनने गौरव केला त्या तेल्या-तांबोळ्यांच्या पुढाऱ्याचा–टिळकांच्या ‘ स्वदेशी ’चा अर्थ काय होता ?

टिळकांचा ‘ तेली-तांबोळी ’ ते जनता पक्षाचा ‘ नांगरधारी–लहान शेतकरी ’ ही भारतीय लोकशाही समाजवादाची एक महान परंपरा आहे.

## ही परंपरा चैनबाजीच्या आर्थिक धोरणामुळे उध्वस्त होणार का ?

टिळकांना ‘ लिपस्टिक ’ची भेट देणाऱ्या या चैनबाजीच्या अर्थशास्त्रावर–विचारसरणीवर–धोरणावर ‘ जनता ’ पक्ष हल्ला चढवणार की ‘ नांगरधारी शेतकरी ’, छोटा–मध्यम कारखानदार, स्वतंत्र उद्योजक, कामगार-नोकर, लहान दुकानदार यांचा बळी जाऊ देणार ?

चरणसिंगांचे बंड हे नांगरधारी किसानांचे, या लहान लहान घटकांचे बंड की श्रीमंत जमीनमालकांची–‘ कुलकवर्गा ’ची ही चढाई ?

**एक शोधप्रयत्न....**

## माणूस : किसान-कामगार विशेषांक

‘ इराण ’ विशेषांकानंतर प्रसिद्ध होणारा एक महत्त्वपूर्ण अंक.

अधिक तपशील लवकरच.

## साप्ताहिक माणूस

**वर्ष अठरावे-अंक तेहतिसावा**

१३ जानेवारी १९७९

**मूल्य ७५ पैसे**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९


# सप्रेम नमस्कार

तीस डिसेंबर एकोणीसशे अठ्ठयाहत्तरची वर्ध्यातील दुपार. रस्ते गर्दीने फुललेले. कारण पंतप्रधान श्री. मोरारजी देसाई त्या दिवशी वर्ध्यात आलेले.

नुकतीच इंदिराजींची अटक व सुटका झाल्याने वातावरणात तणाव. हा विदर्भ; तेव्हा अनेक 'विदर्भवीरांनी'– 'कसे पंतप्रधान वर्धेत पाय ठेवतात बघतो–' म्हणून अस्तन्या सावरलेल्या. त्यामुळे लोकांमध्ये भलतेच औत्सुक्य आणि पोलिसांची प्रचंड धावपळ.

तर अशा दुपारी एका रस्त्यावरच्या काही युवकांकडे गर्दीचे लक्ष जाते. ह्या तरुणांच्या छातीवर व पाठीवर नारे चिकटवलेले–

'जब तक भूखा इन्सान रहेगा,
धरतीपर तूफान रहेगा।'
'जनेऊ तोडो, जाती छोडो,
मानवको मानवसे जोडो।'
'गाँवगाँवमें हो सरकार,
बाँटो दिल्लीके अधिकार।'
'जब तक रहेंगे शोषणकारी,
तब तक रहेगा आरक्षण जारी।'

ह्या युवकांच्या हातात पत्रके. ती वाटत हे मूक निदर्शक पुढे जात असतात.

हे युवक म्हणजे महाराष्ट्र छात्र युवा संघर्ष वाहिनीचे कार्यकर्ते. 'चुकलं तर कान पकडा' असं सत्ताग्रहण करताना सांगणाऱ्या पंतप्रधानांना, निवडून येताना जनतेला दिलेल्या आश्वासनांची आठवण करून देण्यासाठी हे युवक निघालेले. प्रत्यक्षात, त्यांच्या कानांपर्यंत हात पोचणं तर दूरच, त्यांच्या संरक्षणासाठी उभारलेले कठडे आणि पोलिसांचे अडथळे यांना ओलांडून ह्या युवकांचा आवाज पंतप्रधानांपर्यंत पोचणंही मुश्किल.

ह्याचीही जाणीव ह्या कार्यकर्त्यांना होतीच. म्हणूनच, आपल्या पत्रकांतून निदर्शनांमागची भूमिका स्पष्ट करताना, पंतप्रधानांना उद्देशून त्यांनी म्हटले होते– 'तुमच्याकडे मागण्या करून वा मागण्यांच्या पूर्तीसाठी तुमच्यावर विसंबून राहून चालणार नाही, ह्याची आम्हाला जाणीव आहे. जनशक्ती व जनआंदोलन ह्यावर आमची अढळ श्रद्धा आहे. जनतेच्या संघटित शक्तीच्या बळावरच आमच्या मागण्या आम्ही पूर्ण करून घेऊ. आजची निदर्शने म्हणजे ह्या मागण्यांच्या पूर्तीसाठी उभारावयाच्या आंदोलनाची नांदी आहे.'

वातावरणातील सारे तणाव, पोलिसबंदोबस्त गृहीत धरूनही, शांततामय निदर्शने करून ज्या मागण्या जनतेपर्यंत आणि जनतेच्या प्रतिनिधींपर्यंत पोचवण्यासाठी हे युवक निघाले होते, त्या मागण्या अशा होत्या–

१ : निवडून आलेल्या प्रतिनिधीला परत बोलावण्याचा जनतेचा अधिकार (Right to recall) घटनेत मान्य करण्यात यावा. एकदा मत टाकून निवडून दिल्यानंतर पाच वर्षेपर्यंत मन मानेल तसे वागण्याचा अधिकार आम्ही कुणालाही देणार नाही. लोकप्रतिनिधी आपले कर्तव्य बजावण्यास नालायक ठरला, तर त्याला परत बोलावण्याचा अधिकार आम्हाला मिळायला हवा.

२ : काम करण्याच्या अधिकारास 'मूलभूत अधिकार' म्हणून घटनेत मान्यता मिळावी.

३ : ज्या ज्या वस्तूंचे उत्पादन छोट्या उद्योगातून होणे शक्य आहे, अशा सर्व वस्तूंचे उत्पादन मोठ्या उद्योगातून तात्काळ बंद करून छोट्या उद्योगात सुरू करण्यात यावे. उदा. चर्मोद्योग, वस्त्रोद्योग, साबण इत्यादी.

४ : स्वातंत्र्यानंतरच्या तीस वर्षांनंतरही जातीयतेचा नंगा नाच बीभत्सपणे सुरू आहे. जोवर जातिशोषण आहे, तोवर शोषितांना संरक्षण मिळालेच पाहिजे. म्हणून अनुसूचित जाती व जमातींना १९८० नंतरही विशेष सवलती मिळत रहाव्यात. स्त्रियांनाही विशेष सवलती देण्यात याव्यात.

५ : इंग्रजीवर प्रभुत्व मिळवून आमच्यावर राज्य करणाऱ्या तथाकथित उच्च वर्गांची मक्तेदारी संपविण्यासाठी, शिक्षणाच्या समान संधीइतकेच समान शिक्षणही आवश्यक आहे.

म्हणून प्रथमतः पब्लिक स्कूल्स बंद करावीत व

६ : अलिशान व महागडी हॉटेल्स बंद करावीत.

१९७९ सालात वरील मागण्यांचा पाठपुरावा करण्याचा निर्णय छात्र-युवा-संघर्ष-वाहिनीने घेतलेला आहे. त्या मागण्यांसाठी अनुकूल असे लोकमानस तयार व्हावे, त्या मागण्या पेलण्यासाठी जनता समर्थ व्हावी, ह्या हेतूने वाहिनीने टाकलेले हे लोकशिक्षणाचे पहिले पाऊल होते. लोकशिक्षण हाच ह्या निदर्शनांमागचा उद्देश असल्यामुळे मोरारजींच्या सभेत तातडीने जाण्याचा निर्णय घेतलेला नव्हताच. मोरारजींच्या आगमनप्रसंगी उत्सुकतेपोटी एकत्र येणाऱ्या लोकांशी संवाद साधण्याचा तो एक प्रयत्न होता. म्हणूनच, मोरारजींच्या येण्याच्या मार्गावरून न जाता हे निदर्शक गर्दीच्या रस्त्यांवरून पत्रके वाटत पुढे झाले.

लोकांचे कुतूहल जागे होत होते. लोक पत्रके मागून घेऊ लागले, वाचू लागले; प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागल्या. दरम्यान दोनदा पोलिसांनी निदर्शकांना हटकले. निदर्शकांनी आपली भूमिका स्पष्ट केल्यावर पोलिसांनी शांततामय निदर्शनांना हरकत घेतली नाही आणि हे कार्यकर्ते पुढे निघाले; परंतु सुमारे चारेक फर्लांग चालून गेल्यावर त्यांना अटक झाली.

इकडे मोरारजींच्या सभेत तीन कार्यकर्त्यांनी शिरकाव करून पत्रके वाटण्यास सुरुवात केली होती. पत्रके कशाबद्दल आहेत हेच प्रथम पोलिसांच्या लक्षात आले नाही. नंतर मात्र त्या तिघांपैकी एकाला अटक झाली. त्या तिघांमध्ये एक तरुणीही होती.

मोरारजी वर्ध्यातून बाहेर पडल्यावर निदर्शकांना सोडून देण्यात आले.

इंदिरा गांधींच्या अटकेनंतर विदर्भात जो गुंडगिरीचा हैदोस सुरू झाला होता, त्या पार्श्वभूमीवर ही न्याय्य मागण्यांसाठी केलेली निदर्शने म्हणजे लोकशाहीतील हक्क मागण्याच्या प्रयत्नात, लोकशाहीतील कर्तव्ये पाळण्याचा जनतेसमोर ठेवला गेलेला आदर्श होता. निवडणुकीच्या जाहिरनाम्यात दिलेल्या आश्वासनांचा आणि राजघाटावर म. गांधींच्या समाधीसमोर घेतलेल्या शपथेचा विसर पडल्यासारखे वागणाऱ्या लोकप्रतिनिधींना हे तरुण म्हणत होते– '...आम्हाला निदर्शनांची हौस नाही; पण ..पण आम्ही मजबूर आहोत...'

४ जानेवारी — सुनीति कुलकर्णी, वर्धा

# अधिक–उणे आणि संपूर्ण उणे

**चंद्रकांत कुलकर्णी**

## पुणे ते अणे

वळणावळणांचा रस्ता ओसाड परिसरामधून कापत एस्. टी. अणे गावात शिरते. राज्य परिवहन महामंडळाचा मार्गनिवास इथे आहे; पण तो नावालाच. नगरवरून माळशेजघाटमार्गे मुंबईला जाणाऱ्या-येणाऱ्या गाड्या स्टँडपासून दूर अंतरावर मिनिटभर उभ्या राहतात. प्रवाशांनी निवाऱ्यात न थांबता उन्हा-पावसात ताटकळत इथे गाड्यांची वाट पहात थांबायचं. कंडक्टरसाहेब प्रसन्न झाले तर गाडीत घेतात–नाही तर टिंग् टिंग्. डबल घंटी मारून एस्. टी. बाई चालल्या पुढं! पण प्रवाशांची तक्रार नाही आणि प्रवाशांची सेवा हे तर महामंडळाचं ब्रीदवाक्य. चालायचंच.

अण्याला पाऊस अगदी नियमितपणे हमखास पडतो. बहात्तरच्या दुष्काळातही अण्याला बत्तीस इंच पाऊस पडला होता इतकं महाभाग्यवान गाव! पावसाळी बटाटा आणि बाजरी ही इथली मुख्य पिकं. अण्याजवळच पांगरी म्हणून गाव आहे, तिथली बाजरी तर पेशवाईकाळापासून मशहूर! पेशव्यांना लागणारी ज्वारी खडके सरदारांच्या या जहागिरीमधून जायची. भाकरी तर इतकी रुचकर बनते की, बाजरीची भाकरी हा प्रकार चतकोरापेक्षाही जास्त न खाणाऱ्या माझ्यासारख्या शहरवासियाने चार–पाच भाकऱ्या अगदी मजेने खाव्यात!

हमखास पाऊस असूनही इथे मळे–बागा जवळजवळ नाहीतच म्हटलं तरी चालेल. अत्यंत डोंगराळ मुलुख आणि विहिरींना मिळणारा काळाकभिन्न पाषाण यामुळे अण्याच्या परिसरात विहीर बागायत अशी नाहीच. अणे गावात वीज आली आहे; पण विहिरीवर विजेचे पंप नाहीत. विहिरीत पाणीच नाही म्हटल्यावर विजेच्या पंपांनी काय हवा उपसायची आहे? मुलुख डोंगराळ असल्याने असंख्य ठिकाणी पाझर–तलावासाठी उत्तम जागा आहेत. हमखास पावसाचे वरदान मिळालेल्या या भागात जागोजागी पाझर तलाव बांधले गेले असते, तर अणे म्हणजे पुणे जिल्ह्याचे छोटे श्रीनगर बनले असते! पण...

अनंतहस्ते कमलादराने। देता किती घेशिल?–छट, गमवू ते राजकारणाने। मुतारीच्या बांधकामापासून ते सतारीच्या निर्यातीपर्यंत सर्व क्षेत्रं ग्रासणारा राजकारणरूपी कर्करोग येथेही ठाण मांडून बसलेला आहे. लोकशाही, समाजवादी, दलितोद्धारक, पुरोगामी अशी अनेक सरकारं आली आणि गेली. अण्याच्या शिवारातलं गवताचं पानही थरारलं नाही!

अण्याला श्रीरंगदासस्वामींच्या समाधीचं मोठं क्षेत्र आहे. १८५७ उत्थानाच्या उत्तरार्धात इथे रंगदासस्वामी आले. बारा–बारा वर्षं एकेक अग्नीवर विजय मिळवत त्यांनी पंचाग्निसाधना पूर्ण केली. पहिली बारा वर्षं ते फक्त लिंबाचा पाला खाऊन जगायचे. दुसऱ्या तपात वरती आग ओकणारा सूर्य आणि सभोवती लाकडाचे मोठमोठे वासे जळत ठेवून त्याचा दाशाग्नि अशा अवस्थेत दिवस काढायचा आणि रात्री विहिरीत

पृष्ठ १८ वर

# श्रीभगवान उवाच....

**श्री अर्जुन उवाच**

पार्थ म्हणे कृष्णा
उत्तरावे मम प्रश्ना
शमवावी ज्ञानतृष्णा
सर्वज्ञानी ।

जनांचे जे जन
म्हणती कोणी महाजन
कुणी जनता-जनार्दन
भू-तली ।

ऐसे जे सदा-सज्जन
ते मोडूनी विभाजन
येती एकत्र बहुजन
हे कैंचे ? ।

जरी म्हणती एक
तरी मुखे अनेक
सोडती सर्व विवेक
हे कैंचे ? ।

परस्परांत भांडती
तरी एकत्र नांदती
रोज नवनवेच सांगती
हे कैंचे ?।

'जातो, जातो', म्हणताती
मोठे मेळावेही घेती
तरी समेटासी बैसती
हे कैंचे ? ।

म्हणे लोकांची ही शाही
लोक म्हणती तैसे होई
तरी लोकांकडे लक्ष नाही
हे कैंचे ? ।

प्रश्न अवघे पाच
मम जाणण्याची आच
होत नसेल जाच
तरी उत्तरावे ।

**श्री भगवान उवाच**

तुझे प्रश्न पाच
मजला कैसा जाच
तो तर जनांस
अवनीवरच्या ।

त्यातही भारतदेशी
जो सर्वसमावेशी
लोकशाहीची काशी
त्या स्थळी ।

राहती नाना लोक
विसरती तहान-भूक
केली जी एक चूक
पुनरपि करिती ।

त्यांना शाहीची आस
परि तो केवळ भास
दुजाला देती त्रास
अकारण ।

म्हणे आम्ही निरंकुश,
आणि स्वतःवरी खूष
खरे काय ते मजसी पूस,
अज्ञानरूपा ।

कुणावरी ना अंकुश
असे हे निरंकुश
पंच वर्ष करुनी कूस
निद्रासुख अनुभवती ।

त्या ठिकाणी स्त्री एक
जणू मंथरा अनेक
तिच्या समीप सेवक
विहरती ।

तिने उच्छाद मांडला
आडवा आला तो कांडला
कुणाच्या धरूनी दंडाला
ढकलला ।

कैक तुरुंगात गेले
लोकशाहीचे नारे दिले
काही देत देत मेले
पुण्यवंत ।

पक्का विचार जाहला
जो जो जगला-वाचला
तो तो बाहेर आला
आक्रंदत ।

बाई लोकमत घेई
जणू स्व-मृत्यूची खाई
जनता लाखोली वाही
शिव्यांची ।

चतुर जे होते
त्यांना माहीत पुरते
माप केले चुकते
लढूनिया ।

बाईचा पराभव झाला
जो तो म्हणू लागला
जणू पार्थसारथी कृष्ण
सहाय्यार्थ धावूनि आला ।

कारण यांचा जन्म आत
तुरुंगाच्या चार भिंतीत
दुर्दैवे मीही तयांत
जाणिसी तू ।

पण केवळ लढण्यासाठी
ज्यांच्या पडल्या होत्या गाठी
ते पुन्हा उभे ठाकती
लढावया ।

ज्यांची उभी हयात
गेली होती लढण्यात
परस्परांना पाडण्यात
धन्य जे ।

ते मुख्य शत्रू गेल्यावरी
पुन्हा येती मुद्यांवरी
त्यांना कोण कैसे आवरी
तूचि सांग ।

त्यातही जे अतिवृद्ध
ते परस्परांवर क्रुद्ध
जनहिताची कोणा शुद्ध
राहणार !

उभारुनी कोणी बंड
कोणी हाती धरिती गुंड
ट्रकामधुनी लोकांची झुंड
कोणी आणिती ।

दाखवाया कोणी बळ
नांगरधाऱ्यांना करिती जवळ
बघ टाकिती हे जाळं
धनुर्धारी ।

जो तो स्वत: श्रेष्ठी
स्वत:पलीकडे संपली सृष्टी
अशी ज्यांची सीमित दृष्टी
सदा असे ।

ते काय साधणार ?
काय जनांना देणार ?
फक्त स्व-उदर भरणार !
सदोदित ।

ते जनदेखील थोर
जे शिरी घेती ऐसी चोर
करिती पापे अघोर
जाण तू हे ।

अपराध्याला दाखवावी दया
ताकीद देऊन सोडावे तया
धरावी तयावर प्रेमाचीही छाया
सांगती कोणी ।

हे तो केवळ नतद्रष्टेपण
दयेच्या नावाखाली भेकडपण
उन्मत्त अपराध्या करावे शासन
सर्वदाही ।

अन्यथा तो मत्त होऊन
संत्रस्त सकला करून
आपुली सत्ता पुन्हा स्थापून
राज्य करी ।

हेही जेथे न कळते
कळले तरी न वळते
ते राज्य असेच जळते
आपोआप ।

तुझ्या पाचा प्रश्नांची
ही उत्तरे साची
करू नको माझी गोची
अधिक विचारोनी ।

— सतीश कामत


**तीन राजहंस प्रकाशने**

राजहंस प्रकाशन पुणे

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

**आणि ड्रॅगन जागा झाला**

**लेखक : अरुण साधू । मूल्य : चवदा रुपये**

**फिडेल, चे आणि क्रांती**

**लेखक : अरुण साधू । मूल्य : सात रुपये**

**पूर्णिया**

**लेखक : अनिल अवचट । मूल्य : सहा रुपये**

# संक्रमण

## माणूस सुखी का नाही ?

वा. दा. रानडे

आज मकरसंक्रांत, तिळगूळ घेऊन गोड बोलण्याचा दिवस. काहींना यात सौदा वाटतो तर गोड बोलण्यासाठी तिळगुळाची लाच कशाला असेही काही जण परखडपणे म्हणतात; पण हा परखडपणा असतो वाचेचा, कृतीचा नव्हे. आपली कामे साधण्यासाठी त्यांनाही प्रसंगी गोड बोलावे लागते, दुसऱ्याचे तोंड गोड करावे लागते, ही मानवी व्यवहारातील सहजप्रवृत्ती आहे.

तिळगूळ घ्या, गोड बोला याचा अर्थ मी वाच्यार्थाने घेत नाही. सर्वत्र आनंददायी वातावरण असू द्या असा त्याचा भावार्थ. गोड बोलण्याने, गोड खाण्याने हे वातावरण निर्माण करावयाचे. आनंददायी वातावरण नको असे कोण म्हणेल ? समाजातील काही थोडी विघ्नसंतोषी माणसे सोडली तर आनंद सर्वांनाच हवा असतो. सुखी, आनंदी जगाची निर्मिती हे केवढे उदात्त ध्येय आहे! पण सुख, आनंद कशात आहे ?

जगी सर्व सुखी असा कोण आहे ।
विचारी मना, तूच शोधूनि पाहे ।।

हे समर्थांचे वचन प्रसिद्ध आहे. श्री. बाळासाहेब भारदे यांनी एका पुस्तक-प्रकाशन-समारंभात केलेल्या भाषणात त्याचा निराळा अर्थ लावला, जगात कोणीच सुखी नाही असा या वचनाचा सर्वसाधारण अर्थ आपण घेतो; पण भारदे यांच्या मते त्या प्रश्नाचे उत्तर दुसऱ्या ओळीतच दिलेले आहे. विचारी माणूस सर्वांत सुखी हे ते उत्तर. पण विचारी माणसे तरी खरोखरच सुखी असतात का ?

दैनंदिन जीवनात आपणास काय अनुभव येतो ? विचारी माणसं सारखा विचार करून डोक्याला त्रास करून घेत असतात. ही माणसं योग्य पद्धतीनं विचार करीत नाहीत म्हणून त्यांना त्रास होतो असं काही जण म्हणतील; पण उलट जगातील दुःख, दैन्य, दारिद्र्य पाहून जो अस्वस्थ होत नाही तो विचारी माणूसच नव्हे असंही म्हणता येईल. तत्त्वज्ञान ही विचारानेच गाठलेली उंच पायरी आहे. विश्वाच्या उत्पत्तीचं गूढ उकलण्यासाठी झालेल्या चिंतनातूनच निरनिराळी तत्त्वज्ञाने निर्माण झाली. चिंतनशील मनाला विचारात, चिंतनातच आनंद लाभतो; पण चिंता निराळी आणि चिंतन निराळे. आपणापैकी बहुतेक जण चिंता करीत असतो, चिंतन नव्हे. त्यामुळेच मनाविरुद्ध गोष्टी घडल्या की आपण त्रस्त होतो, व्यथित होतो. उलट चिंतनशील माणसं बऱ्याच प्रमाणात स्थितप्रज्ञ असतात.

पण जग बदलण्यासाठी केवळ विचार पुरेसा नाही. विचार कृतीला उद्युक्त करणारा हवा. विश्वाच्या उत्पत्तीची उकल करण्यातही आनंद आहे; पण सुखी विश्व निर्माण करण्यासाठी केलेल्या धडपडीत अधिक उच्चतर आनंद आहे. 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु' अशी स्वप्ने आमच्या प्राचीन तत्त्वज्ञांनी पाहिलेली आहेत; पण ही स्वप्ने साकार कशी करावयाची हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. 'विश्वाच्या स्वरूपाचा उलगडा तत्त्वज्ञांनी केला. आमचे कार्य ते बदलण्याचे आहे' असे कम्युनिस्ट विचारप्रणालीचा प्रणेता कार्ल मार्क्स म्हणत असे; पण जग बदलायचे कसे ? त्यासाठी कामगारवर्गाच्या क्रांतीचा मार्ग मार्क्सने जगापुढे ठेवला. आज दोनपंचमांश जगात कम्युनिस्ट पद्धतीची समाजपद्धती आहे; पण या समाजव्यवस्थेत तरी माणूस सुखी झाला आहे का ? जगापुढील प्रश्न सोडविण्यात कम्युनिस्ट विचारप्रणालीही अपुरी ठरली आहे. याचा अर्थ भांडवलदारी पद्धती चांगली असे मला मुळीच सूचित करावयाचे नाही; पण कम्युनिस्ट पद्धतीतील उणीवा प्रामाणिकपणे मान्य न करता नुसतीच तिची तरफदारी करीत राहणेही मला मान्य नाही. केवळ क्रांती करून आणि समाजपद्धती बदलून माणूस बदलत नाही. रशियात शेतकरी खासगी शेतात दर हेक्टरी जास्त पीक काढतो आणि सामुदायिक शेतात कमी काढतो, याचा अर्थ क्रांतीला साठ वर्षे उलटून गेल्यानंतरसुद्धा त्याच्या मनोवृत्तीत बदल झालेला नाही. रशियन महिलांनी पुरुषांच्या बरोबरीने अनेक क्षेत्रांत कर्तबगारी दाखवली असली तरीही रशियन पुरुषांत अजूनही नवरेशाही मनोवृत्ती आढळत असल्याच्या तक्रारी मधून मधून केल्या जातात. याचा अर्थ माणूस बदलण्यासाठी खास वेगळे प्रयत्न करायला हवेत. गांधीजींचा भर माणूस बदलण्यावर होता, तर कम्युनिस्टांचा समाजव्यवस्था बदलण्यावर आहे. या दोहोंची सांगड घालायला हवी. डॉ. लोहियांच्या सात क्रांत्या किंवा जयप्रकाशांची संपूर्ण क्रांती यात व्यक्ती व समाज या दोहोंच्याही सम्यक् परिवर्तनाचा विचार आहे. सबंध मानवसमाज सुखी करण्यासाठी त्या दिशेनेच वाटचाल करायला हवी. रस्ता लांब पल्ल्याचा आहे; पण तो आक्रमायलाच हवा. जवळच्या वाटांनी तात्कालिक यश लाभल्यासारखे वाटले तरी ते टिकाऊ असणार नाही.

सुख, आनंद मिळविण्यासाठी अनुकूल परिस्थिती तर हवीच; पण केवळ पैशाने सुख मिळत नाही. सुखसोयींसाठी माणसाने यंत्रे निर्माण केली; पण तो यंत्रांचा गुलाम बनला आणि सुख हरवून बसला. रोजच्या धकाधकीच्या जीवनातच तो एवढा व्यग्र असतो की आनंद उपभोगण्याची, सौंदर्याचा आस्वाद घेण्याची त्याची वृत्तीच मारली जाते. ती जोपासली पाहिजे.

आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे मनाचे स्वास्थ्य. ते लाभल्याशिवाय तुम्ही सुखी होणार नाही. इतर सर्व गोष्टी अनुकूल असूनही मनःस्वास्थ्य नसले तर माणूस आनंदी राहू शकत नाही.

मुरब्बी गोडबोली, तोंडावर स्तुती करणारी माणसे मला आवडत नाहीत. आपणास खटकलेल्या गोष्टीही सांगायलाच हव्यात; पण दुसऱ्याला न दुखवता ते सांगण्याची कला आत्मसात करायला हवी.

तिळगूळ घेणे व गोड बोलणे प्रतीकात्मक आहे. स्वतः आनंदी रहा आणि दुसऱ्याला आनंदी करा हाच त्यामागील व्यापक संदेश आहे असे मला वाटते.

☐

परराष्ट्रीय घडामोडी । चन्द्रशेखर पुरन्दरे

# तैवान

चीन-अमेरिकासंबंध सुधारण्याचा सगळयात मोठा फटका तैवानला बसला. १५ डिसेंबरला जाहीर झालेल्या या निर्णयाचा धक्का अजून ओसरलेला नाही. तैपेईमध्ये अमेरिकन दूतावासासमोर अजूनही मोठ्या प्रमाणात निदर्शने चालू आहेत. १९४९ मध्ये चँग कै शेक तैवानला आला तेव्हापासून अमेरिकेने तैवान हाच खरा चीन होय अशी भूमिका घेतली होती. या चँग कै शेकचा सावत्र मुलगा चँग चँग कुआ हा तैवानचा सध्याचा अध्यक्ष. तो तर या निर्णयाने वेडापिसाच झाला किंवा अधिक खरे बोलायचे झाल्यास तसा अभिनय तरी त्याने केला. चीन व अमेरिकेचे संयुक्त पत्रक जाहीर होण्याआधी केवळ सहा तास तैपेईमधील अमेरिकेच्या राजदूताने ही बातमी चँग चँग कुआला सांगितली होती. ती अधिकृतरीत्या जाहीर झाल्यानंतर जी अमेरिकेच्या विरोधाची लाट उसळली त्यात केवळ विरोधच नव्हे तर पुढे काय? या प्रश्नाने आलेली अगतिकता व हताशपणाही सामील आहे.

याचे कारण उघड आहे. चीनच्या दृष्टीने तैवान त्याचाच अविभाज्य भाग आहे. इतकी वर्षे प्रचंड पैसा ओतून आधुनिक शस्त्रसामुग्रीने अमेरिकेने तो सज्ज ठेवल्याने चीनला त्यावर आक्रमण करता आलेले नाही; परंतु १ जानेवारी १९८० ला अमेरिका-तैवानचा संरक्षणकरार संपुष्टात येईल आणि तदनंतर अमेरिका तैवानच्या संरक्षणाला बांधील रहाणार नाही.

## तैवानचे संरक्षण

अर्थात् याचा अर्थ तैवान एकदम पोरका झाला आहे असे नाही. आशियातील उत्कृष्टांपैकी एक गणले जाईल असे सैन्य व शस्त्रास्त्रे तैवानकडे आहेत. हॅरॉल्ड ब्राउन या अमेरिकेच्या संरक्षणसचिवाच्याच सांगण्याप्रमाणे तैवान स्वत:च्या बळावर अजून पाच वर्षे सहज तग धरू शकेल. शिवाय अमेरिका अजून अनिश्चित काळपर्यंत तैवानला शस्त्रास्त्रे विकू शकेल. करार संपला याचा अर्थ शस्त्रास्त्रांचे व्यवहारच अशक्य झाले असा नव्हे. सध्याचाच शस्त्रांचा ओघ १९७९ भर चालेल. तैवानचे पाच लाख सैन्य हे अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे. चीनचे सैन्य एकूण ३६ लाखांच्या घरात असले तरी त्याच्या आणि तैवानच्या टकरीमध्ये तैवान त्याला आज वरचढ ठरू शकेल. त्यामुळे येत्या दोनतीन वर्षांमध्ये तरी तैवानच्या संरक्षणाचा प्रश्न चीनच्या आक्रमणाची फारशी शक्यता नसल्याने उद्‌भवेल असे वाटत नाही. अर्थात अमेरिकेचा वरदहस्त वरच्यावर फिरल्याने तैवानची हवेलंडी उडणे स्वाभाविक आहे; परंतु हा निर्णय त्यांनाही पूर्णत: अनपेक्षित होता असे म्हणता येणार नाही. या निर्णयानंतर ताबडतोब तैवानच्या पंतप्रधानाने आता संरक्षणखर्चात प्रचंड वाढ करण्यात येईल असे जाहीर केले. त्यावरून तैवानला अस्तित्वाचा प्रश्न एकदम विक्राळ स्वरूपात भेडसावू लागला आहे हे उघड दिसते.

## चीनची भूमिका

संयुक्त पत्रक प्रकाशित होण्याआधी अगदी चोवीस तासपर्यंत तैवानच्या प्रश्नावरच चीन-अमेरिकेची झटापट चालू होती. चीनला मान्यता देणे व तरीही तैवानला शस्त्रपुरवठा चालू ठेवणे हे चीनला मंजूर नव्हते; परंतु अमेरिकेने ते पदरात पाडून घेतले. चीनचा समर्थ पुरुष तेंग सिआओ पेंग हा त्याचा देश आधुनिक तंत्रज्ञानाने समृद्ध करण्याच्या वेडाने भारावलेला आहे. वाटेल ती किंमत देऊन, वाटेल त्या अटींवर सध्या पाश्चात्य तंत्रज्ञान आयात करण्यात येत आहे. तैवानच्या त्या तुलनेत छोट्या असणाऱ्या प्रश्नावर ही पुढची तंत्रविषयक महत्त्वाची बोलणी फिसकटणे चीनला अजिबातच फायद्याचे नव्हते. म्हणून शेवटी 'तैवानी जनतेला आम्ही एकटे सोडणार नाही' यासारखे कार्टरचे उद्‌गार चीनने सहन केले.

दुसरे एक कारण असे असावे की, तैवान अमेरिकेपासून एकदम लांब गेल्यास रशिया तिथे शिरकाव करून घेण्याची शक्यता चीनला वाटली असावी आणि म्हणून अमेरिका त्याहून बरी अशी भूमिका चीनने घेतली असावी. अर्थात् हे कारण तितके सबळ नाही. कारण तैवान आणि रशियाचे अजिबातच सख्य नाही. उद्या जर रशियाने चीनवर हल्ला केलाच, तर आम्ही रशियाच्या विरुद्ध बाजूलाच उभे राहू असे तैवानच्या चँग चँग कुआचे सुस्पष्ट म्हणणे आहे; परंतु आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये कोणत्या शक्ती एकदम जवळ येतील याची शाश्वती नसल्याने त्यातल्या त्यात अमेरिका तैवानशी संधान बांधून राहिली तरी चालेल; पण तैवान एकटा पडायला नको असा चीनने विचार केला असावा.

## तैवानची परिस्थिती

तैवानमध्ये आधुनिक औद्योगिक व्यवस्था आहे, प्रमुख व्यापार अमेरिकेशी चालतो आणि तो संरक्षणकराराच्या नंतरही चालू रहायला काहीच प्रत्यवाय नाही. इलेक्ट्रॉनिक्स प्रगत असल्याने तैवानला आर्थिक आघाडी शाबूत राखता येईल. मात्र ही परिस्थिती फार काळ टिकेल असे वाटत नाही, ते का हे लेखाच्या शेवटी पाहू.

स्वत:च्या संरक्षणासाठी आण्विक शस्त्रे बनविणार नाही असे त्याच्या उपसंरक्षणमंत्र्याने जाहीर केले. न्यूक्लिअर नॉन् प्रॉलिफरेशन ट्रीटि (NPT) वर सही करणाऱ्यात तैवान एक आहे; परंतु ती १९६८ ची गोष्ट. तेव्हा परिस्थिती अगदीच निराळी होती. आज तसे जर झाले व तैवानने जर आण्विक शस्त्रे बनविलीच तर परिस्थिती गंभीरच होईल. त्यामुळे चीन फार जपून पावले टाकणार हे उघड आहे.

रशियन आणि व्हिएतनामी सीमांवर अस्वस्थता असल्याने चीन इतक्यात तैवानकडे वळणार नाही. त्याला ते परवडण्यासारखे नाही. सध्या तैवानशी अगदी संबंध सुधारण्याकडेच वाटचाल होईल. मर्यादित

पृष्ठ १७ वर

# प्रयाग येथे समूर्त होणारा ' हिंदू विराट '

## त्रिवेणी संगम

डॉ. फत्तेहसिंग, उत्तरप्रदेश

प्रयाग हे भारतीयत्वाचे प्रतीक आहे. देवपूजा, ऐक्यत्व (संगतीकरण) यांच्या दर्शक अशा यज धातूपासून तयार झालेल्या या शब्दाचे स्वरूप याग असे झाले आहे. त्याला जोडली गेलेली ' प्र ' ही उपाधी लक्षात घेतली म्हणजे त्याचा अर्थ देवपूजा आणि दानाचा समावेश असलेल्या ऐक्यभावनेची सर्वोच्च प्रक्रिया असा होतो. याच धातूपासून बनलेला यज्ञ असा दुसरा शब्द आहे; पण त्याचा अर्थ विश्वाच्या सर्वोच्च एकात्मतेचे तत्त्व असा आहे.

प्रयागप्रक्रियेचे मी येथे जे विवेचन करणार आहे, ते देवपूजा आणि दान यासारख्या धार्मिक संप्रदायाच्या आवश्यक अंगाशी संबंधित असल्याने ज्यांना धर्म म्हणजे अफूची गोळी, विघटन आणि वादाचे मूळ वाटते, त्यांना कदाचित पचणार नाही. राजा हर्षाकडून घतल्या जाणाऱ्या पंच वार्षिक परिषदांच्या कामकाजांच्या निष्कर्षातून मात्र अगदी वेगळी कथा निष्पन्न होते. हर्ष राजा दिवसचे दिवस वेगवेगळ्या धर्मांच्या प्रतीक चिन्हांची उपासना करीत असे आणि त्यांच्या अनुयायांना दान देत असे. या जाहीर धर्मोपासनेमुळे लोकांना त्यांच्या धर्म व राज्यप्रमुखांकडून धर्मसहिष्णुता, दानप्रवृत्ती, बुद्धिमत्ता ग्रहण करता येई आणि त्याचो परिणती भावनात्मक एकात्मता आणि धार्मिक सहजीवनात होई. त्याचबरोबर या धर्मांच्या अभिमान्यांना एकत्र जमून आपआपल्या धर्मसंप्रदायांच्या विभिन्नतेतील एकतेचा शोध घेता येई. हा शोध हाच एकात्मतेच्या प्रयोगप्रक्रियेचा गाभा होता आणि त्यातूनच गंगा आणि यमुनेच्या संगमाला त्याचे नामाभिधान प्राप्त झाले आणि जगाला बहुभाषी, बहुधर्मी आणि बहुप्रादेशिक अशा हिंदू समाजाचा लाभ झाला.

हा चमत्कार कसा घडला याचा शोध घ्यावयास मात्र आधुनिक जगताला हर्षाच्याही किती तरी पूर्वीच्या काळाकडे मागे जावे लागेल. ' हिंदू एकात्मता ही परंपरागत धर्मतत्त्वाची एकात्मता आहे ' असे सुप्रसिद्ध फ्रेंच पंडित आणि तत्त्वज्ञ रेने गेनेर म्हणतो. या परंपरागत धर्मतत्त्वाचा उगम वेदांनी जेव्हा मानवतेच्या वैश्विक एकात्मतेचा समावेश असलेल्या विश्वमानवाची कल्पना केली तेव्हाच्या जीर्ण प्राचीनतेत आहे. आपल्या स्वतःच्या बाबी पाश्चिमात्यांच्या डोळ्यांतून पाहण्याची सवय झालेल्या आपण त्या सुप्रसिद्ध विद्वानांच्या मोलिक मार्गदर्शनाची दखल घ्यावयास हवी. ' या पौर्वात्यज्ञांची महान चूक अशी की, कोणत्याही धर्मतत्त्वांचा योग्य भावार्थ जाणण्यासाठी पहिली गरज त्यांच्या प्रवर्तकांच्या दृष्टिकोनाशी शक्य तेवढी जवळीक साधणे ही असता ते स्वतःच्या पाश्चिमात्य भूमिकेचा दृष्टिकोन आणि स्वतःचे मानसिक भिंग यातून पाहतात.' या चुकीचा अत्यंत घातक परिणाम म्हणजे हिंदु समाज आणि त्याची परंपरा जाणून घेण्यात आपल्याला अपयश येणे, विभिन्नतेतील खरी एकात्मता ज्यामुळे निर्माण झाली त्या धर्मतत्त्व-शिकवणुकीच्या प्रक्रियेची वैचारिक आणि योग्य अशी प्रतीके आपल्याला उमजलीच नाहीत.

### देवपूजेची कल्पना

हा दृष्टिकोन स्पष्ट करण्यासाठी देवपूजेत एकात्मता निर्माण करणाऱ्या कल्पनेचे उदाहरण उत्तम ठरेल. मानवतेचा सर्वांत जुना धर्मग्रंथ ऋग्वेद.याची घोषणा आहे की, ज्ञान्यांकडून वेगवेगळ्या प्रकारे वर्णन केले जाणारे सत्य हे एकच आहे. (ऋ. वे. १.१६४.४६) ते म्हणजे, ' वेगवेगळ्या प्रकारे जळणारा एकच अग्नी सर्व विश्व प्रकाशित करणारा एकच सूर्य, वेगवेगळ्या प्रकारांनी तळपणारी एकच उषा विश्वाची संपूर्ण विभिन्नता भासणारी एकात्मता.' (ऋ. वे. ८.५८.३) या सर्वोच्च एकात्मतेचे प्रतीक म्हणून निवड झाली ती अग्नीची; पण प्रतीक म्हणजेच प्रतिरूप झालेली बाब असे मानणे चुकीचे ठरेल. अनेक अग्नी असतात त्याप्रमाणे सत्याचे (ऋ. वे. १.१.५) प्रतीक असलेल्या अग्नीला कामापुरती अनेक नावे देता येतील ही गोष्ट ऋग्वेदाने गुप्त ठेवलेली नाही. (ऋ. वे. १०.१४१.६) अशा प्रकारे प्रतीकात्मक अग्निपूजा कल्पिली गेली. ती भूत, भविष्य आणि वर्तमान अशा तिन्ही काळातील सर्व पूजाप्रकारांचे एकच, सर्वोच्च, एकात्मता निर्माण करणाऱ्या सत्याच्या उपासनेत एकीकरण करण्यासाठी. कोणी एखाद्या पृथ्वीवरील वस्तूची उपासना करो. कोणी स्वर्गीय अंशाची करो की कोणी अंतर्गत प्रकाशाची. ते स एकच आहे. दृश्य म्हणा किंवा अदृश्य स्वरूपात.

### दानाची कल्पना

या एकात्मक दैवी उपासनेतून निर्माण झालेली दानाची कल्पना एकात्मतानिर्मितीच्या हेतूची पूर्तता करते. मानवी व्यवहाराशी संबंध जोडला म्हणजे अग्नी स्वतःमध्ये सर्व माणसे समाविष्ट करतो. (ऋ. वे. १. ९६. ४), त्यांच्या सर्व सपत्तीच्या मीलनाचा बिंदू म्हणून उपयुक्त ठरतो. (ऋ. वे. १. ९६. ६) आणि एकात्मतेने तत्त्व, यज्ञ म्हणून कल्पिल्या गेलेल्या सर्व कृतींचे साधन बनतो. कोणालाही आपण मदतीचा हात पुढे करतो तो असतो अग्नी. सर्व श्रेष्ठ दाता. जो आपल्यामधून कार्यरत होतो.(ऋ. वे. ८. ३२. २) याचा अर्थ दानाची प्रत्येक कृती ही दैवी कृती आहे. एक याग आणि या दानाच्या कल्पनेवर उभारलेला समाज म्हणजे प्रयाग. याचाच

अर्थ सामाजिक जीवनाचे संपूर्ण एकीकरण ज्याला म्हणता येईल तो सर्वोच्च त्याग.

### रास्त्री, सामाजिक जाणीव

या एकात्मतेची एक श्रेष्ठ खास कल्पना राष्ट्रामध्ये पाहता येईल. राष्ट्र म्हणजे पृथ्वी व तीवरील जनतेचे संयुक्त अस्तित्व होय आणि त्याचा शब्दश: अर्थ 'देशाचा एकत्र साठा' असा आहे. माता पृथ्वी आपली रती नैसर्गिक संपत्तीच्या स्वरूपात लोकांना देणे. या संपत्तीतून लोक वस्तू तयार करतात आणि आपला वाटा म्हणून राष्ट्राला देतात. त्यातून त्याची आत्मप्रगटीकरणाची शक्ती निर्माण होते. तेच माणसे आणि सामग्रीच्या संपत्तीचे एकीकरण करणारे राष्ट्री म्हणून ओळखले जाते.

अशा सर्व लोकांची एकात्मता घडवून आणणारे दान दैवी शक्तीला देणगी ठरते. म्हणून आपण अग्नीची प्रार्थना करतो. 'एक रती अर्पण करण्याच्या संदर्भात मी तुझे आसन बनो.' (ऋ. वे. ६. ५०. ९) ही महानता प्राप्त होण्यासाठी आपल्याला इराचे आसन असणारे संयमी मन असले पाहिजे. (ऋ. वे. १०. १९१. १). हे भगवद्गीतेतील सर्वोच्च आत्मिक ज्ञान आहे. मन, हृदय आणि प्रतीकात्मक देवपूजेची एकवाक्यता साधून सर्वांनी मिळून राष्ट्रसेवा करा, असे आवाहन करीत अग्नी जळत असतो. (प अ. रु. ९. ४. ५) यम, नियम आणि संयम यांसारख्या कल्पनांमध्ये समाविष्ट असलेल्या स्वशिस्तीच्या प्रतिमेतून संयमी मन तयार होते. यम, नियम आणि संयमाला समाजहितासाठी स्वार्थहीन कठोर परिश्रमाची जोड हवी. या दोन प्रतिमांचे प्रतिनिधित्व प्रयागसंगमात एकत्र होणाऱ्या अनुक्रमे यमुना आणि गंगेकडून केले जाते. या दोन नद्यांना येऊन मिळणारी सरस्वती म्हणजेच रस्त्री–श्रेष्ठ मानसिक आणि श्रेष्ठ व्यक्तित्वरूप झरा. जनजीवनाला शिस्त लावणारी, थोरपणा आणणारी यमुना जेथे जेथे नि:स्वार्थी कठोर परिश्रमाच्या गंगेशी ऐक्य साधते तेथे तेथे सरस्वती आपोआप येऊन त्रिवेणी संगम साधतो. हा त्रिवेणी संगम म्हणजेच देवपूजा आणि दानावर आधारलेल्या एकात्मतेची श्रेष्ठ प्रक्रिया असलेल्या समजाचे प्रयागमध्ये रूपांतर.

आगामी विश्व हिंदु संमेलन आमच्या समाजात पुन्हा अशा प्रयागाची पुनर्रचना करण्यासाठी होत आहे. ते आपण यशस्वी करू या. □

प्रस्तुत लेखक बनारस हिंदु विद्यापीठाचे डॉक्टर ऑफ लेटर्स, नामवंत शिक्षणतज्ञ, राजस्थान ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट, जोधपूर (राजस्थान) च्या संचालक पदावरून निवृत्त झाले आहेत. वैदिक धर्म व इतर संशोधन यावरील अनेक लेख आणि ग्रंथ त्यांच्या नावावर जमा आहेत. धर्माप्रमाणेच तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, सिंधु संस्कृती आणि धर्म आदींचे त्यांचे गाढे संशोधन विद्वद्मान्य आहे.

## वातावरणात 'प्रयाग'

प्रयागच्या द्वितीय विश्व हिंदू संमेलनास आणि विश्व संस्कृत-संमेलनास आता थोडा अवधी राहिल्याने महाराष्ट्रातील विश्व हिंदू परिषदेच्या विविध जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांच्या धडपडीमुळे जनतेत त्याबाबत एक प्रकारची अनुकूल उत्सुकता निर्माण झाल्याचे ठिकठिकाणांहून आलेल्या वृत्तांवरून म्हणता येईल. नोव्हेंबर व डिसेंबर महिना हा बहुतांशी निरनिराळ्या जिल्ह्यांच्या ठिकाणी उत्साहाने व थाटाने साजरा झालेल्या जिल्हा संस्कृत-संमेलनांनी गाजला. संस्कृत ही भारतीय संस्कृतीची खाण असून, जगातील विविध भाषांची जननी आहे. त्यामुळे तिचा शिक्षणाच्या विविध स्तरांवर अंतर्भाव असला पाहिजे व कर्नाटक सरकारचे या बाबतीत अनुकरण करण्यात यावे असे निरनिराळ्या संमेलनांतून ठरावांद्वारे सुचविण्यात आले.

या विधायक कार्यास जनता, त्या त्या ठिकाणच्या प्रमुख संस्था आणि विशेषकरून बहुतेक वर्तमानपत्रे यांनी मोलाचे सहकार्य दिले, हे लक्षात घेण्याजोगे आहे. सदर संस्कृत-संमेलनांना वृत्तपत्रांनी छायाचित्रांसह भरपूर प्रसिद्धी दिली, तर आकाशवाणी व दूरचित्रवाणी यांनीही त्यांची चांगल्या प्रकारे दखल घेतली आणि 'जनसामान्यांसाठी संस्कृत आवश्यक' हा संदेश सर्वत्र पसरविण्यास चांगल्या प्रकारे हातभार लावला. त्यामुळे लोकांत एक प्रकारची जन-जागृती निर्माण झाल्याचे दिसते. ही संस्कृत संमेलने म्हणजे दुसऱ्या जागतिक विश्व हिंदू संमेलनाची नांदीच ठरेल असे म्हटले तर वावगे ठरू नये.

अर्थात हे प्रयत्न काही आपोआप झाले नाहीत. त्यासाठी अनेक कार्यकर्त्यांना महाराष्ट्रातील बहुतेक जिल्ह्यांत प्रचार-दौरे काढावे लागले. अनेक प्रतिष्ठितांच्या व संस्था-प्रमुखांच्या भेटी-गाठी घ्याव्या लागल्या. काही ठिकाणी जाहीर सभाही आयोजित करण्यात आल्या. प्रचारपत्रके, विनंतिपत्रे, बैठका, संस्थांचे सहकार्य व तज्ज्ञांचे मार्गदर्शन यासारख्या अनेकविध उपायांचा अवलंब करावा लागला. विश्व हिंदू परिषदयंत्रणा आता महाराष्ट्राच्या बहुतेक जिल्ह्यांच्या ठिकाणी पोचली असून, त्यातील निदान प्रत्येक तालुक्याच्या गावी पोचली पाहिजे असा संकल्प कार्यकर्त्यांनी सोडला आहे आणि त्या दृष्टीने परिषदेचे महाराष्ट्र प्रदेशसंघटक प्रा. बाळासाहेब आपटे यांनी महाराष्ट्रातल्या बहुतेक जिल्ह्यांचा दौरा पुरा केला असून, अनेक ठिकाणी त्यांची जाहीर भाषणे, प्रतिष्ठितांच्या व कार्यकर्त्यांच्या बैठकी आणि काही प्रमुख लोकांच्या भेटी-गाठी अशा प्रकारे विविध उपक्रम त्यांनी या दौऱ्यात केले. प्रा. बाळासाहेब आपटे यांनी नुकतेच प्रयाग-संमेलनानिमित्त 'विज्ञानयुगात हिंदू धर्म' ही छोटी पुस्तिका लिहिली असून, ती अलीकडे प्रकाशित झाली आहे. त्या छोट्या पुस्तकाची किंमत अवघी सत्तर पैसे असून, त्यात मांडलेले मुद्दे कोणासही पटण्याजोगे आहेत. सदर पुस्तिकेचा खप वाढत्या प्रमाणात होत असल्याचे समजते.

याशिवाय परिषदेचे महाराष्ट्र प्रदेशाचे मंत्री श्री. मा. के. जोशी, नासिक भागातील विभागप्रचारक श्री. हरिभाऊ साने, प्रदेशाचे उपाध्यक्ष श्री. भाऊसाहेब जहागिरदार, एक प्रमुख कार्यकर्ते श्री. राजाभाऊ लिमये, संस्कृतचे तज्ज्ञ श्री. डॉ. पाटील, ठाण्याचे श्री. दादासाहेब लिमये व निरनिराळ्या जिल्ह्यांत काम करणारे अनेक कार्यकर्ते हेही सतत संमेलनाची बरीचशी माहिती देण्यासाठी ठिकठिकाणी हिंडत असून संमेलनाच्या पूर्वतयारीस व संमेलन-प्रतिनिधि-नोंदीस मोठा हातभार लावीत आहेत.

बहुतेक जिल्ह्यांच्या ठिकाणी आणि काही तालुकासमान गावी असे

आढळून येते की,या बहुतेक सर्व ठिकाणी भित्तिपत्रके, पत्रके जागोजागी लावलेली नजरेस भरतात, तर काही चित्रपटगृहांतून स्लाईडही प्रदर्शित होतात. या सर्व माध्यमांद्वारे आपल्या समाजबांधवांना तीर्थराज प्रयागला येण्याचे आमंत्रण आहे. कारण जागतिक स्वरूपाचे दुसरे हिंदू संमेलन आणि विश्व संस्कृत संमेलन तेथेच भरणार आहे. चित्रपटगृहातील स्लाईड 'प्रयागला चला' असेच सांगतात, तर अगदी अलीकडे बऱ्याच मोटारींवर प्रयाग-संमेलनाबाबचे पत्रक काचेवर अग्रभागी ठळकपणे लावलेले पाहाण्यात येते आणि दूरवर जाणाऱ्या मालमोटारींवर मोठी पत्रके हे निमंत्रण देताना आढळतात.

याच्याच जोडीस गावोगावी लहान-मोठ्या सभा आणि बैठकींतून प्रयाग-संमेलनाची माहिती वेगवेगळ्या वक्त्यांकडून ऐकून अनेकांचा या जागतिक संमेलनास जाण्याचा आजवरचा निर्णय आता पक्का होऊ लागल्याचे निरनिराळ्या शहरांकडून प्रदेश कार्यालयाकडे येणाऱ्या अहवालांवरून समजते. याखेरीज काही प्रमुख शहरांतून कार्यकर्ते गटगटाने आपापल्या परिचितांकडे जाऊन संमेलनाचे प्रतिनिधी नोंदणीचे काम झपाट्याने करीत आहेत. व्यवसायानुरूप काही खास बैठकीही पुणे-औरंगाबाद आदी ठिकाणी आयोजित केल्याचे समजते.

जगातील भारतासह सर्व देशांतील हिंदू समाजापुढील एकात्मभावाच्या आड येणाऱ्या अडीअडचणी समजून घ्याव्यात व त्यावर संत, महंत, पीठाधीश, विचारवंत, चिंतक, समाजसेवक आदींच्या मार्गदर्शनाने व विचाराने मात कशी करावी, याबाबत चर्चा व विचारविनिमय होणार आहे. भारतातील अंदाजे ५० हजार प्रतिनिधी येथे उपस्थित राहतील तर परदेशांहून सुमारे एक हजार बांधव येतील, असा अंदाज आहे. महाराष्ट्रातून सुमारे २००० ते २५०० हजार प्रतिनिधी प्रयागला येतील असे सध्याच्या उत्साहदायी वातावरणावरून वाटते असे एका जबाबदार कार्यकर्त्याने बोलून दाखविले.

२४ जानेवारी ७९ ला विश्व संस्कृत संमेलन तर २८ जानेवारीच्या मौनी अमावास्येस पवित्र पर्वणी या दरम्यान २५ ते २७ जानेवारी १९७९ अशा तीन दिवशी हे महान विराट विश्व हिंदू संमेलन, विश्व हिंदू परिषद या आंतरराष्ट्रीय संघटनेने योजलेले आहे. विशेष म्हणजे गेल्या पिढीतील थोर व्यक्तींनी भारतात १९६४ मध्ये ती स्थापलेली आहे आणि पहिले विश्व हिंदू संमेलन सन १९६६ मध्ये भरले होते.

## प्रवासाची सोय रेल्वेभाडे सवलत

विश्व संस्कृत संमेलन व जागतिक हिंदू संमेलनास होणारी ही गर्दी लक्षात घेऊन महाराष्ट्रीय काही प्रमुख यात्राकंपन्यांनी याच सुमारास आपल्या यात्रा–सहली उत्तर भारतासाठीच आयोजित केल्या आहेत. भारतदर्शन, राजकमल, विश्राम, सफारी, धनश्री इत्यादींचा या यात्राकंपनीत समावेश असून, त्यांच्या जाहिरातीही वारंवार वाचण्यास मिळतात. त्याशिवाय मुंबईहून २१ जानेवारीस प्रयाग, काशी, गया अशी त्रिस्थळी यात्रा करणारी स्पेशल ट्रेनही परिषदेच्या प्रयत्नाने निघण्याचे नक्की झाले. त्याबाबत रेल्वेचे पत्रकही आले आहे. त्या शिवाय संस्कृत संमेलनासाठी रेल्वेबोर्डाने प्रतिनिधींना एकरीभाडे–दुहेरीप्रवास–अशी भाडेसवलत नुकतीच जाहीर केली असून त्याकरिता अधिक माहिती स्थानिक स्टेशनमास्तरांकडे वा परिषदकार्यालयाचे मदतीने रेल्वेविभागीय अधिकाऱ्यांकडे मिळू शकेल. या सवलतीवर, पुण्याप्रमाणेच मुंबई, मिरज, सोलापूर अशा मोठ्या रेल्वेस्टेशनवरून प्रवास सुरू करता येईल. या सोयीचा लाभ घेणाऱ्यांनी अधिक चौकशी करून, योग्य तो निर्णय घेणे इष्ट. ही सवलत प्रवासप्रारंभ दिनांकापासून ३० दिवसांत जाऊन त्याच मार्गाने परत आणि दरमहा रु. १८०० खाली उत्पन्न असलेल्या व्यक्तीस मिळेल. मॅटेडोर, खाजगी वाहन, एस्. टी. वा खाजगी बसेसुद्धा काही जिल्ह्यांतून निघणार असल्याच्या बातम्या समजल्या आहेत.

विश्व हिंदू संमेलनाचे शुल्क किमान अवघे पंधरा (१५) रुपये असून त्यात प्रयागला राहाण्याची सोय होईल. ती मुख्यत्वे तंबूत असेल. महाराष्ट्रासाठी स्वतंत्र नगर मिळणार असून, त्याचे नाव 'संतज्ञानेश्वर नगर' असे असेल. मुंबईप्रमाणे इतर काही स्टेशनांवरून खास गाडी, नाही तर खास डबे निघतील असे ठिकठिकाणी चाललेल्या तयारीवरून समजते. जेवण पॅकेटमध्ये, एक रुपयात मिळण्याची व्यवस्था केली आहे. चहा, नास्ता वगैरे मिळण्यासाठी उपहारगृहे असतीलच. प्रवास व तेथील सर्व खर्च ज्याने त्याने स्वतःच करावयाचा आहे.

अनेक प्रवचनकार, कीर्तनकार पुढे आले असून, तेही संमेलनाची माहिती आपापल्या माध्यमातून देत आहेत. शिक्षक, कामगारवर्ग यासारख्या विविध स्तरांतील बांधव आपल्या समाजाच्या या भव्य संमेलनासाठी अहमहमिकेने कार्य करताना, अनेक गावी हिंडताना दिसत आहेत.

पुण्याहून तर प्रयागला प्रदर्शन व संमेलनउभारणीसाठी दहा जणांची तुकडी मागेच रवाना झाली आहे. तसेच अजून बरेचजण जाण्यास तयार आहेत असेही दिसते. त्या तुकडीत बहुतेकजण कलाकार आहेत.

महाराष्ट्रातील विश्व हिंदू परिषदेच्या निरनिराळ्या कार्यालयात चक्कर मारली तर नागरिकांची गर्दी आता दिसू लागली आहे. संमेलन प्रतिनिधी शुल्क किती, रेल्वेप्रवासाची व्यवस्था काय, निवासाची सोय, खाण्या-पिण्याची सोय आहे ना? आम्ही दहाजण येणार आहोत, तेव्हा आमची सोय होईल ना? संमेलनातील चर्चा काय होणार? यासारखे अनेक प्रश्न घेऊन ते उत्सुकतेने कार्यकर्त्यांजवळ विचारणा करताना दिसतात, तर त्याहीपुढे जाऊन गुपचूपपणे तेथे फलकावर लावलेली विविध पत्रके वाचून शुल्क आणि प्रवासभाडे भरून आपला जाण्याचा बेत नक्की करून टाकतात. अशा वर्गात विविध थरांतील महिला व पुरुषवर्ग असतो. तरुणांचे तांडेही येतच असतात.

पुणे येथील प्रदेश कार्यालयात तर सारखीच गडबड असते. निरनिराळ्या राज्यांतील परिषद कार्यालयांतून प्रयाग संमेलनासाठी छायाचित्रांची पाकिटे येऊ लागली आहेत. ती एका आकारात करून घेऊन तेथील प्रदर्शनात मांडली जातील. त्या त्या भागातील प्रकल्प, कार्यक्रम, प्रमुखांच्या भेटी, व्याख्याने इ. विविध विषयांची समग्र स्मरण देणारी ही छायाचित्रे आहेत. त्यासाठी इतर अनेक प्रकारचे साहित्य गोळा करावे लागत आहे. कलावंत व कार्यकर्ते तर त्या

कामात गटश: गुंतलेले आहेत, तर आलेल्या नागरिकांना, कार्यकर्त्यांना हवी ती माहिती आपुलकीने चटकन देण्यातही काही कार्यकर्ते मग्न असतात. काहीजण लिखाण, पत्र, टपाल आणणे, नेणे, पाठविणे इत्यादी कामांत चूर असतात. आणखी काही निरनिराळ्या ठिकाणी होणाऱ्या बैठका, सभा यांची व्यवस्था लावण्याची चर्चा करतात, तर कुणी टेलिफोन उचलून उत्सुकांना उत्तरे देत असतात.

अखिल जगातील हिंदू समाजाचे अतिभव्य दुसरे संमेलन तसेच साजेसे होणार असल्याने त्याची माहिती सर्वत्र अगदी डोंगराळ भागातही मिळावी म्हणून कित्येक हजारो पत्रके, फलक, भितीपत्रके, सिनेस्लाईड, स्टीकर, प्रचारसभा, बैठका, भेटी-गाठी, वैयक्तिक पत्रके, धर्माधीश, पीठाधीश, संत-महंत इत्यादींचे संदेश सर्वत्र गेलेले आहेत व त्यांचे कामही पुरे होत आलेले आहे असे कार्यालयाकडून समजले. या प्रचंड संमेलनास वीस लाख रुपयांवर खर्च यावा असा कयास असून त्या दृष्टीनेही अनेकजण रु. १०१ ते १० हजारापर्यंत देणगी-रूपाने निधिसंकलन करीत आहेत; परंतु धनिक व सहाय्यभूतवर्गाने स्वयंस्फूर्तीने पुढे यावे व आपला वाटा उचलावा, असे परिषदकार्य-कर्त्यांचे आवाहन आहे. सधनांनी किमान रु. ५०१ ते १० हजार रुपयांची देणगी देऊन संमेलनाच्या स्वागतसमितीचे सदस्य व्हावे असे एका पत्रकात नमूद केले आहे. त्यानुसार अनेक धनिक पुढे येऊ लागलेले आहेत.

देशातील उपराष्ट्रपती, पंतप्रधान, मंत्री, परराष्ट्रमंत्री, परदेशांतील नेपाळ, थायलंड, मॉरिशस आदी अनेक देशांचे प्रमुख यांना निमंत्रण देण्यात आले आहे. तसेच अनेक संत-साधू, पंथप्रमुख, श्री. शंकराचार्य, पंडित, चिंतक इत्यादींना निमंत्रणे पाठविण्यात येत आहेत. त्यामुळे या विशाल संमेलनास उपस्थित राहण्याची पर्वणी साधावी असे आता लोकांना वाटू लागले आहे.

अशा रीतीने अन्य राज्यातल्याप्रमाणे आपल्या महाराष्ट्रातही या दोन्ही विश्वसंमेलनांबद्दल कमालीचे औत्सुक्य, उत्साह तसेच जोरदार पाठिंबा असल्याचे दिसून येते. □

**(विश्व हिंदू परिषद । मध्यवर्ती प्रसिद्धी विभागातर्फे प्रसारित)**

# मंदिरे ही समाजसेवाकेंद्रे व्हायला हवीत

**द्वारकाप्रसाद पटोदिया यांची मुलाखत । मिलिंद करमरकर**

हिंदू समाजाचे संघटन, संवर्धन, संस्करण करण्याचे प्रयत्न विश्व हिंदू परिषद गेली ११-१२ वर्षे करीत आहे. वनवासी क्षेत्रातील बांधवांसाठी विविध उपक्रम, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे, मागास भागात शाळा, आदिवासी-वनवासी क्षेत्रात सुसज्ज रुग्णालये आणि जेथे रुग्णालये बांधणे अशक्य आहे त्या भागात वैद्यकीय उपचारांची व्यवस्था आदी मार्गांनी विश्व हिंदू परिषदेचे समाजकार्य अविरत चालू आहे. या समाजसेवेशिवाय हिंदू धर्मावर इतर धर्मांचे जे आक्रमण चालू आहे त्याला लोकशिक्षण आणि कायदा अशा दोन्ही मार्गांनी विरोध करण्याचे काम चालू आहे. तसेच धर्मांतर केलेल्या मूळच्या हिंदू बांधवांना पुन्हा हिंदू धर्मात घेण्याचे महत्त्वाचे कार्यही परिषद गेली अनेक वर्षे करीत आहे. या नेहमीच्या गोष्टींव्यतिरिक्त देशात कोठेही पूर, दुष्काळ, अतिवृष्टी अशा नैसर्गिक आपत्ती येतात तेव्हा परिषदेचे अनेक कार्यकर्ते अन्न, औषधे घेऊन त्या भागात संकटविमोचनासाठी धाव घेतात. हिंदू धर्म बलवान बनविण्यासाठी हिंदू धर्माच्या प्राचीन तत्त्वांचा प्रसार करून या जगात शांतता प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट ठेवून १९६६ च्या जानेवारीत स्थापन झालेल्या विश्व हिंदू परिषदेचे कार्य हे असे विविधांगी आहे.

६६ साली कुंभमेळा होता व त्या वेळी साऱ्या जगभरच्या हिंदू समाजातील लोक तेथे जमले होते व त्यांनी विश्व हिंदू परिषदेची स्थापना केली. दर बारा वर्षांनी कुंभमेळ्याच्या वेळी पुन्हा एकत्र जमायचे व आपल्या कार्याचा आढावा घ्यायचा, ध्येयधोरणात योग्य तो बदल करावयाचा, नवीन योजना आखायच्या व पुन्हा आपापल्या भागात जाऊन हे कार्य पुढे चालू करावयाचे असे तेव्हा ठरले होते. त्यानंतरचा कुंभमेळा आणीबाणीच्या काळात आला. सचोटीच्या, प्रामाणिक सामाजिक कार्यकर्त्यांचे तेव्हाच्या सरकारला वावडे असल्याने व एकंदरीत परिस्थिती अनुकूल नसल्याने ते संमेलन तेव्हा झाले नाही. त्यामुळे द्वितीय विश्व हिंदू संमेलन आता २५, २६, २७ जानेवारी १९७९ या दिवशी प्रयाग येथे भरणार आहे.

संमेलनास खर्चही तसाच प्रचंड म्हणजे सुमारे २० लाख रुपयांच्या आसपास येणार आहे. एवढा खर्च ज्या संमेलनास होणार आहे त्याचा कार्यक्रम काय आहे, त्याची उद्दिष्टे काय आहेत आदी गोष्टींची माहिती मिळविण्यासाठी मी विश्व हिंदू परिषदेचे अखिल भारतीय सचिव श्री. द्वारकाप्रसाद पटोदिया यांची भेट घेतली.

'गेल्या बारा वर्षांत आम्ही आमच्या ध्येयाच्या दिशेने किती वाटचाल केली आहे, आपण घेतलेल्या मार्गापासून दूर गेलो आहोत का, ध्येय साध्य करण्यासाठी आणखी काय केले पाहिजे आदी गोष्टींचा विचार करण्यासाठी हे संमेलन आयोजित केले आहे' असे त्यांनी प्रारंभीच मला सांगितले.

या संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी शंकराचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य, रामानंदाचार्य आदी हिंदू धर्मातील सहा प्रमुख आचार्य उपस्थित

रहाणार आहेत. तसेच विदेशातील हिंदू धर्माचे अभ्यासक, हिंदू धर्मगुरू यांची उपस्थितीही अपेक्षित आहे असे त्यांनी सांगितले. या वेळी एक स्मरणिकाही प्रकाशित करण्यात येईल व तिच्यात हिंदू-धर्मासंबंधी अनेक लेख ग्रथित केलेले असतील.

या तीन दिवसांच्या कार्यक्रमात एकूण सहा सत्रे होतील व सहावे म्हणजे शेवटचे सत्र हे खुले अधिवेशन असेल. संमेलनात एकूण ५०,००० प्रतिनिधी व खुल्या अधिवेशनास एकूण १,००,००० हिंदूधर्मीय उपस्थित रहातील अशी आमची अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले.

या संमेलनात मांडण्यात येणाऱ्या ठरावांबाबत माहिती सांगताना ते म्हणाले, 'आपल्या हिंदूधर्मात अस्पृश्यता ही जी वाईट गोष्ट शिरली आहे तिला नष्ट करण्यासंबंधाने एक ठराव असेल. अस्पृश्यता धर्माला मान्य नाही व म्हणून खऱ्या हिंदूधर्मियाने अस्पृश्यता मानू नये असा ठराव या संमेलनात मांडला जाणार आहे. दुसरा एक ठराव जातिभेदाविरुद्ध आहे. जातीच्या आधारावर एक नीच, एक उच्च असे मानण्यात येऊ नये. वास्तविक पहाता प्राचीन काळी श्रमविभागणीनुसार जातिव्यवस्था होती व समाजात सर्वच जातींना सारखे महत्त्व होते व सारखा मान होता; पण स्वार्थी लोकांनी या जातिव्यवस्थेला जातिभेदाचे रूप दिले. त्यामुळे हिंदू समाजाची एकी भंग पावली. समाज विभागाला गेला व त्यामुळे हिंदूधर्मावर इतर धर्मांनी आक्रमण करण्यास सुरुवात केली व हिंदू धर्माचे पतन होण्यास सुरुवात झाली. हिंदूधर्म हळूहळू कमी होऊ लागला. जातिभेदांमुळे हिंदूधर्माची ही स्थिती झालेली असल्यामुळे या जातिभेदांविरुद्ध एक ठराव मांडण्यात येईल.

'भारतात अरुणाचल प्रदेश आणि इतर भागात हिंदूंचे सक्तीने धर्मांतर चालू आहे. त्याविरुद्धही एक ठराव मांडण्यात येईल. गाईला आपल्या धर्मात महत्त्वाचे स्थान आहे; पण आजकाल गाईची आबाळ चालू आहे. अनेक ठिकाणी गोहत्या चालू आहे; पण केवळ गोहत्या थांबवून चालणार नाही, तर या गोसंपत्तीचे संरक्षण आणि संवर्धन करून आपल्या देशात दुधाचा भरपूर पुरवठा करणे यासंबंधी एक ठराव मांडण्यात येणार आहे. वास्तविक पहाता या दिशेने कलकत्त्यात परिषदेने एक उपक्रम चालू केला असून त्याला चांगले यश आणि प्रतिसाद मिळत आहे' असे श्री. पटोदिया यांनी सांगितले.

'या संमेलनातच एक मातृसंमेलन भरविण्यात येणार असून त्या संमेलनात मातांना हिंदू धर्मोत्थानाच्या दृष्टीने काय कामगिरी करावयाची आहे याचे मार्गदर्शन केले जाईल. मातृशक्ती ही बालकांवर संस्कार करणारी शक्ती असल्याने देशाचे भवितव्य घडविण्यास त्यांचा हातभार लागणे महत्त्वाचे आहे. या संमेलनास श्रीम. ज्योती वेंकटाचारन्, श्रीम. शारदा मुखर्जी आदी भाग घेणार आहेत.

'एका साधुसंमेलनात भारतातील साधुशक्तीचा समाजसुधारणांसाठी कसा उपयोग करता येईल याचा विचार या संमेलनात केला जाईल. साधू म्हणजे ढोंगी किंवा काही ठिकाणी मुले पळविणारा अशी जी प्रतिमा तयार झाली आहे त्याऐवजी साधूंचा समाजसुधारणेसाठी उपयोग करून घेण्याचा विचार आहे. आपल्या देशातील मंदिरे, मठ ही केवळ भक्तिक्षेत्रे न रहाता ती समाजसेवाकेंद्रे व्हावीत असा प्रयत्न परिषदेतर्फे केला जाणार आहे.

'१९७९ हे वर्ष आंतरराष्ट्रीय बालकवर्ष म्हणून साजरे करण्याचे संयुक्त राष्ट्रसंघाने ठरविले आहे. त्या निमित्ताने आपल्या देशातील सुमारे १०-१५ लाख अनाथ बालकांना घर, पालक मिळवून देण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून परिषद आपले कार्य सुरू करणार आहे. त्यासंबंधानेही एक ठराव या संमेलनात मांडण्यात येणार आहे.

यानंतर एका ठरावात विदेशातील हिंदूंच्या समस्यांचा विचार करण्यात येणार आहे. या वेळी भारताचे परराष्ट्रमंत्री श्री. अटलबिहारी वाजपेयीही उपस्थित रहाणार आहेत. कॅरेबिअन समुद्रातील बेटांतील हिंदूंनी स्थानिक युवतींशी विवाह करावेत अशी सक्ती तेथे होत आहे. तसेच पाकिस्तान, बांगलादेश येथील हिंदूंच्याही अनेक समस्या आहेत. पाकिस्तान, बांगलादेश, ब्रह्मदेश येथे हिंदूंची अनेक पवित्र क्षेत्रे आहेत. या ठिकाणी जाण्यास अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. यांपैकी अनेक ठिकाणी आपले धर्मग्रंथही नेण्यास बंदी आहे. याबाबत काय करता येईल याचा विचार परराष्ट्रमंत्र्यांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे. तसेच जम्मू-काश्मिर, केरळ, आसाम अशा भारतीय राज्यांत जेथे हिंदू अल्पसंख्य आहेत त्यांच्या समस्यांचाही विचार करण्यात येईल.

'या संमेलनाआधी दोन दिवस विश्व हिंदू परिषद आणि पाँडेचरी माताजी जन्मशताब्दी समिती यांनी एक संस्कृत संमेलन आयोजित केले आहे. या वेळी संस्कृत भाषेचे महत्त्व, अलीकडे तिची झालेली पीछेहाट यांचा विचार करण्यात येईल. तसेच संस्कृतला परत मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी कार्यक्रमांची आखणी केली जाईल. संस्कृत ही सर्व भारतीय भाषांची जननी आहे. त्यामुळे संस्कृतमधील अनेक शब्द अनेक भारतीय भाषांत जसेच्या तसे आलेले आहेत. संस्कृत शिक्षणाने भाषा-भाषांतील अंतर कमी होईल व भारताची एकात्मता वाढण्यास त्याची बहुमोल मदत होईल' असे श्री. पटोदिया म्हणाले.

'याव्यतिरिक्त हिंदुधर्मातील कर्मकांड कमी करण्यासाठी व आचारसंहिता तयार करण्यासाठी एक आणि हिंदू धर्मातील अनेक गोष्टींच्या मागे जो शास्त्रीय दृष्टिकोन आहे तो स्पष्ट करण्यासाठी एक, अशा दोन विद्वत्-सभाही परिषदेने नेमल्या आहेत' अशी माहिती श्री. पटोदिया यांनी सांगितली.

असे हे द्वितीय विश्व हिंदू संमेलन आणि असे त्याचे कार्यक्रम! त्याच्या यशस्वितेबद्दल आयोजकांना खात्री वाटत आहे. 'या संमेलनानंतर भारतभर छोटी-छोटी संमेलने घेण्यात येतील, त्यांतून परिषदेचे दृष्टिकोन लोकांना समजावून सांगण्यात येतील. हिंदूधर्मातील दुष्ट रूढींविरुद्ध जनजागरण करण्यात येईल व सर्व कार्यक्रम अंमलात आणले जातील' असे श्री. पटोदिया यांनी सांगितले.

समाज-संघटन व नंतर समाज-सुधारणा असे उद्दिष्ट विश्व हिंदू परिषदेने ठेवले आहे. ध्येय लांब आहे, मार्ग खडतर आहे; पण परिषदेच्या कार्यकर्त्यांची जिद्द कोणत्याही प्रकारे कमी नसल्याचा आतापर्यंतचा अनुभव आहे. या कार्यास सर्व हिंदूंनी आपला हातभार लावून धर्मोत्थापनास मदत केली पाहिजे. समाजातील हळूहळू नष्ट होणारी सामाजिक जबाबदारीची जाणीव जरी पुन्हा रुजली तरी या संमेलनाचे उद्दिष्ट पूर्ण होईल! □

# कोंडी फोडून बाहेर पडलेले मुंबईचे युवक !

श्रीकांत सावंगीकर

◻ या पत्रासोबत मी मुंबईच्या छात्रयुवासंघर्ष वाहिनीच्या एक-दीड वर्षाच्या धडपडीचा संक्षिप्त आढावा आमच्या वार्षिक संमेलनानिमित्त पाठवत आहे.

देशात सर्वत्र हुकूमशाही प्रवृत्ती बळावत असताना व सर्वत्र सत्ताकेंद्री राजकारण धुमाकूळ घालत असताना या सर्वांपासून दूर व रचनात्मक कार्यामध्ये गुंतलेल्या युवकांच्या प्रयत्नांना 'माणूस' तर्फे नेहमीच प्रोत्साहन मिळाले आहे व या सर्व निराशाजनक वातावरणात आशेचा प्रकाश दाखविण्याची क्षमता असलेल्या सर्व कार्यास, मग ते कोणत्याही संघटनेचे असो प्रसिद्धी देण्यासाठी धडपडत असलेल्या तुमच्यासारख्याच साप्ताहिकांचा आम्हाला खरा आधार आहे.

याच अपेक्षेने मी आमच्या या संघटनेच्या जन्मापासूनच्या धडपडीचा एक प्रामाणिक आलेख तुमच्यासमोर मांडला आहे. मी स्वतः वाहिनीचा सर्वांत कमी काम करीत असलेला सदस्य आहे व या दीड वर्षात या निरनिराळ्या मुला-मुलींनी ज्या तळमळीने व समर्पणाच्या भावनेने आपले काम चालू ठेवले आहे व वाढवीत आहेत, त्याने मी खरोखरच अत्यंत प्रभावित होऊन हा लेख लिहिला आहे. मुंबईच्या 'Enjoy Life' या वातावरणातून आलेली चार-पाच मुले पूर्ण वेळ आदिवासी गावात झोपडीत राहतात, अंगावर खरूज (स्वतःच्या) येऊनही त्यांचा निश्चय ढळत नाही, ही गोष्ट मला प्रचंड आशादायी वाटते. १७-१८ मुले एकीकडे दिवसा कॉलेजात जातात व दुसरीकडे संध्याकाळी झोपडपट्टयांच्या दलदलीत रमतात (पूर्ण वेळ) ही एक फार मोठी गोष्ट आहे व हे सर्व काम पेलण्यासाठी, संघटना संपूर्ण क्रांतीच्या तत्त्वावर वाढविण्यासाठी, दर शनिवारी व मंगळवारी ४०-५० जण नियमितपणे ४-४ तास काम करतात ! या सर्व गोष्टींना समाजाकडून, ज्यांना आम्ही मानतो त्या बुद्धिवंतांकडून प्रोत्साहन व सक्रिय पाठिंबा मिळालाच पाहिजे असे मला स्वतःला प्रकर्षाने जाणवले व या मुलांची अपेक्षा नसतानासुद्धा मी व्यक्तिशः तुमच्याकडून या प्रयत्नांना योग्य प्रसिद्धी मिळण्याची हक्काने अपेक्षा करून हे पत्र पाठवीत आहे. कारण हक्क आपल्याच माणसावर सांगतात !

१२, १३ व १४ तारखेस आमचे प्रथम वार्षिक संमेलन आहे.
◻

आणीबाणीच्या काळात भूमिगत झालेले पकडले गेलेले असे वाहिनीचे निरनिराळे युवक जनता पार्टीच्या विजयानंतर एकत्र आले व मुंबईसारख्या महानगरीत वाहिनीचा संदर्भ काय, पुढची कामे कोणती यासंबंधात चर्चा करू लागले. सुरुवातीस वातावरण भारले गेलेले होते. त्यामुळे ताडदेवच्या शांताश्रमातील मोठा हॉल सुद्धा अपुरा पडत असे; परंतु कामावर जसजशी चर्चा सुरू झाली व संपूर्ण क्रांतीची सकल्पना किती विशाल आहे आणि त्यासाठी किती प्रचंड काम करावे लागणार आहे याची कल्पना येऊ लागली तसतशी बैठकप्रिय मंडळी आपोआप मागे पडू लागली.

दर मंगळवारी व शनिवारी आम्ही स्टडी सर्कलमध्ये आजच्या सामाजिक व आर्थिक गरजांचे स्वरूप काय, त्यांची व्याप्ति किती आहे, आजच्या सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या संघटना कितपत कार्यक्षम आहेत, संघर्षवाहिनीची भूमिका नक्की कुठे वेगळी आहे, शांतिमय वर्गसंघर्ष कसा होऊ शकेल, कम्युनिझमचा सध्याच्या परिस्थितीत काय संदर्भ आहे, राष्ट्रवादातील कोणती तत्त्वे ग्राह्य आहेत व सर्वांत महत्त्वाचा व पुन्हा पुन्हा निघणारा विषय म्हणजे संपूर्ण क्रांतीची प्रक्रिया व तात्कालिक आणि दूरगामी धोरणे कोणती ?

या सर्व चर्चा करताना आम्हाला मनातून सतत अपराधी वाटत असे. आपण फक्त चर्चाच करत आहोत व अशा चर्चांचा समाजाला काहीही फायदा नाही असेही वाटत असे; पण यासोबतच एक मोठे काम नकळत होत गेले. ते म्हणजे आमची उद्दिष्टे स्पष्ट होत गेली. आम्हाला नक्की काय करायचे आहे हे समजत गेले. निखिल वागळे तेव्हा मुंबई वाहिनीचा संयोजक होता.

ही चर्चांची कोंडी प्रथम फोडली नीता, संदीप व नितीनने. नीताने त्यांच्याजवळच्या सेंट जॉर्ज हॉस्पिटलमध्ये अनौपचारिक शिक्षणाचे वर्ग सुरू केले. सेंट जॉर्ज हॉस्पिटलच्या आवारात तेथील वॉर्ड बॉयीज्, कर्मचारी यांची वस्ती आहे. दिवसभर ही मुले घाणीत खेळत असत व म्युनिसिपल शाळांमधून शिकत असत. तिने एकदा सर्वांना बोलावून त्यांची प्रगतिपुस्तके पाहिली तर जवळजवळ सर्व मुले नापास होती. त्यानंतर तिने हळूहळू त्यांचे वर्ग घेण्यास सुरुवात केली. दक्षिण मुंबईचे एक वाहिनीचे युनिट तेथे हळूहळू या कामातून तयार झाले. त्यात सदस्यही त्या वस्तीतील मुलेच आहेत. आता तिथे कॉलेजात जाणारी तिथली मुलेच त्या मुलांना शिकवितात व विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या सर्व लहान मुलांची एकंदर राहणी वगैरे सुधारलीच; परंतु ते सर्वजण चांगले मार्क्स घेऊन पास झाले. आता त्यांना अभ्यासाची चांगली गोडीसुद्धा लागली आहे. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे कुणाकडूनही दानरूपाने घेतलेला पैसा या मुलांना दिला गेलेला नाही किंवा तशा 'दयाबुद्धीला' या कामात आम्ही अजिबात थारा मिळू दिला नाही.

यानंतर १४ ऑगस्ट १९७७ ला आम्ही तलासरी तालुक्यात 'वेवजी' या आदिवासी भागात तीन दिवसांचे शिबीर घेतले. या शिबिरास निरनिराळ्या महाविद्यालयांतून स्वखर्चाने मुले आली होती. तेथे तीन दिवसात आम्ही या ठिकाणी काय काय काम होऊ

शकेल याचा आढावा घेतला. एन्. एस्. एस्. तर्फे राणेसरांचे कामही तेथे चालूच होते. त्यांची पण या कामात खूप मदत झाली. तेथेच गिरिजनांबरोबर १५ ऑगस्ट साजरा केला व तिथे आता काय काय काम होऊ शकेल याचे आराखडे मनाशी घोळवीतच मुंबईस परत आलो.

## मुंबईतील कामे

त्यानंतर रमेश अवस्थी हा केमिकल इंजिनिअरिंगचा मुलगा संयोजक झाला व अलका देसाई ही एम. ए. ची मुलगी सहसंयोजक झाली. याच वेळेस १९७७–७८ या वर्षासाठी संपूर्ण कामाची रूप-रेषा आखण्यात आली व कामासाठी संपूर्ण मुंबईत निरनिराळे युनिट्स तयार करण्यात आली. दक्षिण मुंबई, माटुंगा, कांजूरमार्ग, मुलुंड, विलेपार्ले, दादर, गोरेगाव या ठिकाणी निरनिराळ्या सदस्यांनी आपापली युनिट्स चालवावी व ताडदेवच्या युनिटला केंद्र मानावे असे ठरले.

आणि यानंतर आमच्या अपेक्षेपेक्षा तुफान झपाट्याने काम वाढू लागले. आम्ही सर्वजण कॉलेज–स्टुडंट्स. अभ्यासातून वेळ असा किती देणार? परंतु तरीही एकत्रित प्रयत्नांमधून कामाचा व्याप वाढू लागला. नीताच्या सेंट जॉर्ज हॉस्पिटलच्या यशस्वी प्रयोगानंतर अलकाने पण विलेपार्लेला 'भगवतीनगर' या झोपडपट्टीत काम सुरू केले व थोड्याच अवधीत ती झोपडपट्टी आपलीशी बनवली. तिथे बाल वाचनालय, महिला उद्योगकेंद्र, साने गुरुजी कथामाला यासारखे उपक्रम सुरू केले. अलका, शुभा, सलील व अजय या विलेपार्लेच्या आमच्या सदस्यांनी या कामाला पूर्णपणे वाहूनच घेतले आहे व यासाठी त्यांनी एक दीर्घमुदतीची योजनासुद्धा बनवून त्या प्रमाणे कामाला दिशा देण्यास सुरुवात केली आहे.

याच वेळी विजय धुरी व त्यांच्या कांजूरमार्गच्या साथीदारांनी तेथे नेहरूनगरच्या झोपडपट्टीत काम सुरू केले. कामाची पद्धत तीच व मिळालेले यशही तसेच. सध्या तेथील मुलेच वाहिनीची सदस्य बनली आहेत व आपल्या वस्त्यांमधून ते स्वतःच संपूर्ण क्रांतीचा झेंडा खांद्यावर घेऊन उत्साहाने काम करत आहेत.

यांच्याच पावलावर पाऊल ठेवून मुलुंडच्या निर्मलने तिथल्या गव्हाणपाडा झोपडपट्टीत पाऊल ठेवले व तेथे काम सुरू केले. गोरेगावला जयंत दिवाणने मोतीलालनगर या वस्तीत सानेगुरुजी कथामाला सुरू केली आहे. तीही याच इराद्याने.

झोपडपट्ट्या व त्यांचा प्रश्न हा साऱ्या मुंबईभर कोसळलेला प्रश्न या मुलांना भेडसावतो जरूर; पण भेदरवून टाकत नाही. 'सृजनशील साहसांना सीमा नसतात' हे बाबा आमटयांचे शब्द त्यांच्या मनावर पक्के कोरलेले आहेत ना!

याच वेळी इकडे मुंबई विद्यापीठात सावळा गोंधळ चालू होता. कर्मचाऱ्यांचा संप, शासनाचे अडवणुकीचे धोरण व विद्यापीठाची अकार्यक्षमता यामुळे परीक्षा बेमुदत पुढे ढकलल्या गेल्या होत्या. (डिसें. १९७७). या निमित्ताने एकत्र बसून विचार करताना आम्हाला जाणवले की, संप मिटणे वगैरे तात्कालिक गोष्टी हा यावरचा उपाय नाही, तर संपूर्ण शिक्षणव्यवस्थेतच बदल झाल्याशिवाय हे प्रश्न सुटणार नाहीत. शिक्षणाचा दर्जा व त्याचा निर्वाहाच्या साधनांशी संबंध यासाठी मुळापासूनच कृती करण्याची गरज जोवर शासनाला वाटत नाही (इतकी कमिशन्स नेमून व त्यांचे रिपोर्टस् येऊनही) तोवर हे सर्व असेच चालू राहणार. आपली भावी पिढी कशी असावी हे ज्या स्वतंत्र राष्ट्राला ठरवता येत नाही ते राष्ट्र कुठेच उन्नती करू शकणार नाही. त्यामुळे आम्ही त्याच वेळी मुंबई विद्यापीठात व त्यानिमित्ताने सर्व शिक्षणक्षेत्रात चालू असलेल्या भ्रष्टाचाराविरुद्ध आंदोलन उभे केले. या आंदोलनाची भूमिका सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी आम्ही सर्वजण अफाट मुंबई शहरात अहोरात्र स्वतः बादल्या हातात घेऊन पोस्टर्स चिकटवीत हिंडत होतो.

यानंतर आम्ही या प्रश्नावर एक जाहीर सभा घेऊन आमचे आंदोलन अधिक तीव्र केले. या सभेस स्वतः जे. पीं.नी आपला संदेश पाठवला होता व आचार्य दादा धर्माधिकारींचे आम्हाला मार्ग-दर्शन लाभले होते. यानंतर विद्यापीठात परिस्थिती तात्पुरती ठीक झाल्यानंतर आम्ही हे आंदोलन स्थगित केले.

## आदिवासी-संघटन

एक दिवस शुभाच्या डोक्यात एक विलक्षण कल्पना आली. तिने लगेच प्रदीप व जयंत दिवाणला बरोबर घेऊन 'वेवजी' या आदि-वासी गावाचा सर्व्हे केला. (जिथे आमचे ४ महिन्यांपूर्वी शिबीर झाले होते). तिथे हे तिघेजण आठवडाभर राहिले. जतीन देसाई, वालावलकर वगैरे मुलांचे काम तिथे चालूच होते; पण तिथला अमानुष जीवनाचा भयानक काळोख हटवण्यासाठी फार मोठ्या मशालीची गरज होती. तिला तिथे काय वाटले कुणास ठाऊक; पण तिने जतीनला व रमेशला एक दिवस सांगून टाकले की, मी आता वाहिनीचे पूर्ण वेळ काम करणार अन् तेही इथेच. तिने तिथेच एक झोपडी उभी केली व तिला वाहिनीचे 'वेवजी युनिट' करून टाकले. जतीनचा अनुभव व तिची जिद्द यातून तिचे काम हळूहळू साकार होऊ लागले. तिथले प्रश्न किती भयानक आहेत याची कल्पना तिथे गेल्याशिवाय येऊच शकत नाही. उदाहरणादाखल सांगतो की, इथे प्रत्येक माणसाला खरूज झालेलीच असते व गायी असूनदेखील त्यांचे दूध काढून पितात, हे त्यांना माहीत नाही किंवा माहीत असले तरी अंधसमजुतींनी ते दूध काढत नाहीत. दारू हे तर त्यांचे नेहमीचे पेय आहे व पूर्ण वर्ष राबून काढलेले सर्व पीक सावकाराने एकही दाणा शिल्लक न ठेवता उचलून घेऊन जाणे हे तिथले नेहमीचे दृश्य आहे. शासनव्यवस्था नावाची गोष्ट कुठे जाणवत नाही. शाळा ओस आहेत.

एवढे मोठे आव्हान त्यांनी पेलले आहे. शुभा, जतीन, वालावलकर जयंत दिवाण, ओझा, प्रदीप व इतर अनेक मुले-मुली या कामात सतत मग्न आहेत. दिवाळी व गणेशोत्सवसुद्धा त्यांनी तिथेच साजरे केले. पोदार कॉलेजच्या मेडिसिनच्या मुलांच्या मदतीने त्यांनी तिथे एक आरोग्यकेंद्र सुरू केले असून खरूज वगैरेवर सतत ट्रीटमेंट देणे सुरू आहे. तसेच तिथे शाळा पूर्ववत सुरू करण्याचे त्यांचे प्रयत्न असून NAEP च्या योजनेखाली तिथल्या पाड्यांमध्ये प्रौढ शिक्षणाचे १० वर्गसुद्धा सुरू होत आहेत.

हळूहळू या सर्वांतून त्यांना संघटित करायचे आहे व शेवटी

सावकारांच्या व दारूच्या जाचातून ते स्वतः मुक्त होतील अशी त्यांचीच चळवळ उभारायची आहे व याच जाणिवेतून तिथे सध्याचे काम चालू आहे.

आदिवासीक्षेत्रात हे काम चालू असताना खुद्द मुंबईत रश्मी आनंद वगैरे मेडिकलच्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घेऊन Medico Friends Circle ही सामाजिक जाणीव असलेल्या मेडिकलच्या विद्यार्थ्यांची संघटना स्थापन केली व काम सुरू केले. तसेच इंजिनिअरिंगच्या मुलांनी 'निर्मिती संसद' ही 'Appropriate Technology' च्या क्षेत्रात काम करू इच्छिणारी संघटना सुरू केली आहे. या सर्वामागे अर्थातच वाहिनीचे संस्कार आहेत.

सत्तेच्या राजकारणात सहभागी व्हायचे नाही परंतु अलिप्तही रहावयाचे नाही, असे वाहिनीचे धोरण असल्यामुळे व राजकीय क्षेत्रातील भ्रष्टाचार संपवणे हे वाहिनीचे एक प्रमुख ध्येय असल्यामुळे वाहिनी वेळोवेळी राजकीय बदलांबद्दल जागृत राहिली आहे. आणीबाणीत जेपींना फॅसिस्ट म्हणणाऱ्यांना साथ देणाऱ्या बी. ए. देसाईना जनता पार्टीने विधानसभेसाठी तिकिट देताच या भ्रष्ट नीतिमूल्यांचा निषेध म्हणून वाहिनीने नारायण तावडे यांना पाठिंबा देऊन त्याकामी दुर्गा भागवत व छगला यांचेसुद्धा सहाय्य घेतले होते. तसेच Right to Recall ची पुन्हा मागणी करण्यात आली.

मूल्यांच्या शुचितेला वाहिनी नेहमीच महत्त्व देत असल्यामुळे स्वतःच्या संघटनांच्या फायद्यासाठी इतर विद्यार्थी संघटनांनी जेव्हा जेव्हा विद्यापीठाविरुद्ध आंदोलने उभारली तेव्हा वाहिनीने त्याचा सक्रिय निषेध केला. फी वाढप्रकरणी व फाउंडेशन कोर्सच्या प्रकरणात वाहिनीने विद्यापीठाला पाठिंबा दिला होता.

तसेच २ ऑक्टोबरला गांधी जयंतीच्या दिवशी आम्ही एक अतिशय अनुरूप कार्यक्रम योजिला. ज्या विषमतेविरुद्ध गांधीजी आयुष्यभर लढत राहिले त्या विषमतेचे भयानक चित्र मुंबईत फाईव्ह स्टार हॉटेलसच्या रूपाने, उत्तुंग इमारतीच्या रूपाने जागोजाग उभे आहे.

त्यामुळे याचा निषेध म्हणून आम्ही १६ जणांनी त्या दिवशी ताज हॉटेलसमोर सायंकाळी शांततापूर्ण निदर्शने करून स्वतःस अटक करवून घेतली व हॉटेलसच्या वाढीला विरोध करणारी पत्रके फेकली. परंतु त्याच दिवशी दिल्लीस झालेल्या Cong (I) च्या हिंसक निदर्शनांमध्ये आमची बातमी लुप्त झाली !

तसेच यानंतर बोहरा सुधारण्यावाद्यांच्या चळवळीलाही आम्ही सक्रिय पाठिंबा दिला. आमच्याचमधील अत्तरवाला या बोहरा युवकाने या कामी पुढाकार घेतला.

अशी ही वाहिनीची मार्च १९७७ पासून ते १ जानेवारी १९७९ पर्यंतची रमेशच्या यशस्वी नेतृत्वाखालील वाटचाल ! सुरुवातीस २०–२५ अस्वस्थ तरुण एकत्र आले व बघता बघता त्यांची चळवळ उभी राहिली. आज मुंबई वाहिनीचे ७०० सदस्य आहेत व १०० सक्रिय सदस्य वेगवेगळ्या पातळ्यांवर काम करीत आहेत. हे काम असेच चालू राहणार आहे—जोवर आमच्यातला अगदी तळचा माणूस प्रतिष्ठेने म्हणू शकेल की, हा समाज माझा आहे व हे काम करण्याचे सामर्थ्य आम्हा युवकांमध्येच आहे, याची आम्हाला निश्चितच जाण आहे. समाजाचे-राष्ट्राचे देणे आम्ही या मार्गानेच अल्पशः फेडू शकू. मात्र यासाठी सर्व भेदभाव विसरून सर्व थरांतील युवकांनी या युगयात्रेत सामील झाले पाहिजे—बाबा आमटेंच्याच शब्दात सांगायचे झाले तर—

माझ्या युवकांनो,

या युगयात्रेत माझ्याबरोबर येण्याची मी तुमच्यावर सक्ती करीत आहे.

युद्धातल्या भरतीसाठी नव्हे  
तर या विराट अभावाच्या पूर्तीसाठी  
आणि तुमच्या—माझ्या अस्तित्वांना अर्थ आणण्यासाठी  
मी तेथे येण्याची तुमच्यावर सक्ती करीत आहे.  
जेथे तुमच्या गरजा तुमच्या ठायी जन्मण्यापूर्वीच जाणल्या जातील  
जेथे तुमच्या अंतरंगात तुम्ही ताठ उभे राहाल  
आणि स्वतःच्या आत ताठ असलेल्यांची  
अभेद्य सेना जेथे तयार होईल  
आतल्या आत तुम्ही किती मोठे आहात  
हे जेथे मी तुम्हाला दाखवू शकेन.

□

**[ वाहिनीचा पत्ता : २९९ शांताश्रम, ताडदेव रोड, नाना चौक, मुंबई, ७ ]**

# तारा प्रकल्प

'तारा प्रकल्प सुरू झालाय... शनिवार–रविवार मीही ताऱ्यातच असते.' 'रुईया'ची गायिका, उर्मिला करकरे सांगत होती— 'तारा गाव' पनवेलपासून १४ किलोमीटरवर. खैराट, बांधनवाडी, कातोडीवाडी व तारा या चार गावांचा हा प्रकल्प... अर्थातच कुतूहल निर्माण झालं— ही मुंबईतली पोरं. सुट्टीचे शनिवार-रविवार मस्तपैकी मुंबईत भटकायचं सोडून तिकडं का धाव घेतात ? पहावसं वाटलं, अन् पुढच्याच शनिवारी १२। वाजता धावत–पळतच कोहिनूर मिलससमोरचा सिडकोचा बसस्टॉप गाठला.

उर्मिला, अशोक सासवडकर वगैरे मंडळी तिथं हजर होतीच. 'हा अशोक आज-काल ताऱ्याचा चक्क चक्क गृहस्थ बनलाय्.' उर्मिलानं ओळख करून दिली. किरकोळ शरीरयष्टीचाच, दाढी वाढवलेला अशोक खूप गंभीर वाटला. थोड्याच वेळात औपचारिकता जाऊन त्याची जागा मैत्रीनं घेतली अन् अशोकनं बसमध्येच एकंदर प्रकल्प सांगायला सुरुवात केली. 'तीन वर्षात आम्हाला तारा प्रकल्प पूर्ण करायचाय्. तसं काम फार कठीण आहे; पण जमवण्याचा प्रामाणिक प्रयत्न राहणारच. तारा विभागाला किमान 'आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी' बनवण्याचा आमचा निर्धार आहे.' अशोक सांगतच होता. पनवेलला आपटा गाडी पकडली व पळसप्याच्या फाट्यावर उतरून पुढं ट्रकनं ताऱ्याला जावं लागलं. कर्नाळा वन-

विभाग ओलांडताना आजूबाजूला डोंगरच डोंगर, सुरेख वनश्री, कुठूनही पाहिलं तरी दिसणारा आपल्या ' जैत रे जैत ' मधला पहाड अन् अशा जागी वसलेलं सातशे-साडेसातशे लोकवस्तीचं तारा गाव ! पुढं युसुफ मेहेरअली सेंटर लागलं. तिथं उतरलो. ' आमचा मुक्काम सेंटरच्याच क्वार्टर्समध्ये असतो ' उर्मिलानं सांगितलं. बाजूलाच सेंटरचं क्लिनिक दिसत होतं. दहा-बारा पेशंटस् डॉक्टरांची वाट पहात बाकड्यावर बसले होते. थोड्याच वेळात लेंगा व बंडी घातलेला तिशीतला एक तरुण स्टेथास्कोप सावरत तिथं पोहोचला. हे डॉ. भावे. काही तरी भरीव काम करावं म्हणून प्रकल्पाचा व्याप सांभाळण्यासाठी आलेले. ' दररोज खूप आदिवासी लोक आजूबाजूच्या भागातून येतात. औषधं घेऊन जातात. आवश्यकच असेल तर आम्ही प्रत्यक्ष वाडीवर जाऊन तपासणी करतो, ट्रीटमेंट देतो. ' डॉक्टर सांगत होते. ' रविवारी मुंबईहून काही तज्ज्ञ डॉक्टरमंडळी भेट देतात. Complicated केसेस सोडवल्या जातात. मुख्यतः जंगलात उपलब्ध असलेल्या आयुर्वेदिक औषधांचा उपयोग व अॅलोपॅथिक औषधांचा उपयोग ह्यांची सांगड घालून उपचारपद्धती करणे ह्यावर मी मुख्यतः भर देतो; पण स्वच्छतेचा अभाव, पाण्याचा अभाव अन् प्रचंड अज्ञानामुळं आलेला निष्काळजीपणा ह्यामुळं हे काम फार जिकिरीचं होतं. '

पुढं अशोकनं बाजूलाच चालू केलेली तेलाची घाणी दाखवली. इथं निमड्याचं तेल काढलं जातं. घाणीवर सध्या फक्त सहा लोकांना रोजगार मिळतोय; पण कच्च्या मालाअभावी हे काम जोरात चालू करता येत नाहीये. वीटभट्टी चालू झालीय. तिथंही पंधरा लोकांना रोजगार मिळू लागलाय; पण ते पुरेसं नाही.

' ह्या प्रकल्पात डेअरीयोजना, कुक्कुटपालनयोजना वगैरे छोटे-मोठे अनेक व्यवसाय हाती का घेत नाही ?' माझा प्रश्न...

त्यावर उर्मिलाचं म्हणणं असं पडलं की, महाराष्ट्र सरकारचं जंगलापासूनचं उत्पन्न १५ कोटींच्या आसपास जातं व जंगलविभागाचा खर्च १३ कोटींच्या घरात जातो. ह्यापैकी आदिवासींना मजुरी म्हणून दोन-तीन कोटी रु. च दिले जातात. बाकीचा खर्च नोकरशाही यंत्रणेवर होतो. म्हणजेच प्रत्यक्ष श्रम करणाऱ्या आदिवासींचं शोषण मात्र मोठ्या प्रमाणावर होतं.

' मग ह्यावर तोडगा काय ?' मी प्रश्न केला.

' शेतकऱ्यांकडून ज्याप्रमाणे शेतसारा घेतला जातो तसंच आदिवासींकडून नाममात्र जंगलसारा घेऊन जंगल-व्यवस्थापन त्यांच्याकडे सोपवलं तर नोकरशाहीवर होणारा खर्च आपोआप कमी होईल व आदिवासींचं उत्पन्न वाढेल. अर्थात् जंगलांची नासधूस होऊ दिली नाही व नीट निगा राखली तर आपलंच उत्पन्न वाढेल, ह्याची जाणीव आदिवासींना व्हायला हवी. म्हणजेच तो जंगलांची जोपासना करील. कच्च्या मालाचा पुरवठा व्यवस्थित होईल आणि जंगल-विकासाबरोबरच जंगल-वस्तूंवर आधारित प्रक्रिया उद्योग सुरू करणं किफायतशीर ठरेल. त्यामुळे साहजिकच आदिवासींना वाढत्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होईल व त्यांच्यातील 'आर्थिक दौर्बल्य' हा घटक मुळापासून उखडून काढण्याला थोडासा तरी हातभार लागेल. '

गप्पांच्या ओघात जवळच्याच खैराट नावाच्या वस्तीवर पोहोचलो. अशोक, उर्मिला, वार्शीचे महाजन वगैरे मंडळी आपापल्या कामाला लागली. पाच-सात मोठ्या झोपड्यांची ही वस्ती ! दौल्या, पांडू, किसन, तुक्या, आयती वगैरे पोरं पाट्या घेऊन वाट पहातच होती. ' पांडूला शिकायची खूप हौस आहे. नुसतं उनाडक्या करण्यात मजा नाही वाटत. बारकू चड्डी सावरता सावरता ग म भ न काढायला शिकलाय. तुक्या चार महिन्यांपूर्वी खूप दारू प्यायचा, त्यामुळं जरा त्रास देतो; पण आज-काल त्याचं दारू पिणं कमी झालंय.' महाजन सांगत होते. वस्तीवरची इतर बाया-बापडी कौतुकानं आपल्या शिकणाऱ्या बछड्यांकडं पहात बसली होती. ' इथल्या शेतावरच्या काकड्या, दुधीभोपळे, मिरच्या, पडवळं वगैरे भाज्या आम्ही जास्त भावात विकत घेतो व पनवेल-मुंबईच्या बाजारात विकतो. उरणारा नफा ह्या लोकांसाठीच कपडे, बी-बियाणं, औषधं वगैरेंवर खर्च होतो. ' अशोक सांगू लागला.

तेवढ्यात धारावीची कुमुद कोरडे, गिरगावातला केतन मजदेकर व अनिल सावंत, गोरेगावचा निखिल वागळे, भांडुपची सुरेखा दळवी वगैरे मंडळी बांधनवाडी, कातोडीवाडीहून मुलांना आंघोळी घालून व पुढचे धडे गिरवायला देऊन खैराटला येऊन पोहोचली.

नंतर रात्री गावकऱ्यांची मीटिंग भरवली होती. गावाला गावठाण नसल्यानं एका गावकऱ्याच्या घरातच ही मीटिंग भरलेली. ' पाणी मिळत नाही, स्वच्छता कुठून असणार ? शेताला पण पुरेसं पाणी नाही. संपूर्ण इलाख्यात दोनच बारवा आहेत. तिथं पण पाणी नसतं. कल्हृचाचा डॅम होईपर्यंत हे असंच चालणार ! ' वगैरे स्वरूपाच्या तक्रारी मांडल्या.

दुसऱ्या दिवशी हडांब्याला गेलो. सर्वपित्री अमावास्या असल्यानं गावची बाप्येमंडळी कुठं तरी बाहेर गेलेली होती. हीही वस्ती पाच-सहा झोपड्यांचीच ! पक्क्या रस्त्यापासून दूर असली तरी खैराटच्या मानानं स्वच्छ वाटली.

कुमुद, केतन, निखिल, अनिल वगैरे जण वस्तीतल्या पोरांना गोळा करू लागली. आज पुढचा धडा गिरवायचा होता. बारकू नाक पुसता पुसता स्वतःचं नाव पाटीवर कोरायला शिकलीयं. ' मम्हईचा न्हवरा पायजे ' म्हणून झिपरी दररोज मन लावून पाटी गिरवते. लक्ष्या धाकाखाली रोज आंघोळ करायला लागलाय. साहजिकच खैराटच्या मानानं इथं खरूज, नायटा वगैरेंचं प्रमाण कमी जाणवलं.

' हे एवढंच शिक्षण देणं कितपत पुरेसं आहे ? ' माझ्या मनात आलेला प्रश्न.

ह्यावर, ' शिक्षणप्रसार ' हा व्हायलाच हवा, याबद्दल सर्वांचंच एकमत झालं. ' आश्रम-शाळांची वाढ व्हायला हवी व विशेषतः स्वयंसेवी संस्थांनी पुढं यायला हवं ! ' निखिल बोलत होता. ' बालवाड्यांचं प्रमाण खूपच कमी आहे. त्याचबरोबर हा भाग बराचसा तुटक असल्यानं प्रत्यक्ष वस्तीवर जाऊन हे काम करायला आदिवासी तरुणच कसे पुढे येतील व त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण कसं दिलं जाईल हे पाहण्यासाठी हा आटापिटा ! ' इति कुमुद कोरडे. आदिवासींना शिकविण्यासाठी शिक्षक व सेवकवर्ग आदिवासी असणंच जास्त किफायतशीर ठरेल; पण त्यांच्या अभावी काम अडून राहू नये म्हणून बिगरआदिवासी स्वयंसेवकांचा उपयोग करून घ्यायला हवाच. अर्थात् त्यासाठी पुण्या-मुंबईच्या युवकांनी स्वयंस्फूर्तीनं ह्या

भागात यायला हवं. मनुष्यबळ त्याचप्रमाणे आर्थिक बळ वाढलं तर त्यांच्या शिक्षणाच्या व त्या वाढविण्याच्या दृष्टीनं काही निश्चित प्रयत्न चालू राहू शकतील.' केतन मजदेकरचं ठाम मत होतं.

एकंदर प्रकल्पाची माहिती मिळाली होती. श्री. पाटील, अशोक सासवडकर, डॉ. भावे ह्यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्पाची सुरुवात तर झालीय; पण तो पुरा होण्यासाठी लागणारं मनुष्यबळ मात्र फारच तोकडं वाटलं.

किमान वेतन, रोजगार हमी, बांधील मजुरी, जमिनीचे हस्तांतरण, खाजगी व्यापारी वगैरेंकडून होणारे शोषण यांसारखे मूलभूत प्रश्न सोडवले जावेत, सामाजिक व आर्थिक सोयींचे जाळे (Infra-structure) आदिवासी विभागात जलद गतीने उभे राहायला हवे, हा उद्देश नुसता तारा, बांधनवाडी, खैरातच्या आसपासचाच नाही. एकंदरीत सर्वच आदिवासीक्षेत्रात थोड्या फार फरकानं असलेली ही परिस्थिती पालटायला हवी.

शेतीविकास व दळणवळण विकास ह्यासारख्या विभागीय विकासाच्या कार्यक्रमांचा फायदा बिगरआदिवासींनाच मिळतो व विकास-योजनांचा फायदा घेण्याची प्रवृत्ती आणि त्यासाठी लागणारे किमान आर्थिक सामर्थ्य यांच्या अभावानं आदिवासींचा विकास फारच संथ गतीनं आज होताना दिसतो.

आदिवासींच्या एकंदर सांस्कृतिक, दैनंदिन, शैक्षणिक व विकास-विषयक गरजांच्या संदर्भात त्यांना प्रभावीपणे शिक्षण घेता आलं पाहिजे ह्यासाठी प्रशासकीय व्यवस्था, विशिष्ट सामाजिक संस्थांच्या निर्मितीची आवश्यकता निश्चितच आहे; पण त्याचबरोबर, युवकांनी असा सातत्याने हातभार लावण्यास काहीच हरकत नाही. नुसते कॅम्पस् किंवा श्रमदान–शिबिरं कितपत पुरेशी ठरणार?

Credit Co-op. Society, Co-operative dairy Scheme स्थापन करणं, सहकारी तत्त्वाचे फायदे त्या लोकांमध्ये रुजवणं, घरावर कौल घालून देणं, वीटभट्टीयोजना, कुक्कुटपालन, गोबर-गॅस प्लॅन्टेशन, त्यांना कपडे, धान्य, इतर गृहोपयोगी वस्तू यथायोग्य भावात उपलब्ध करून देणं यासारख्या व्यक्तिगत लाभाच्या योजना महाविद्यालयीन अथवा बेकार तरुणांनी हाती घेण्यास काहीच हरकत नाही.

निदान गल्लीच्या नाक्यावर गप्पा छाटत किंवा चौपाटीवर वाळू तुडवत बसण्यापेक्षा ह्या संदर्भात थोडा जाणीवपूर्वक विचार केला तर हे चित्र पालटवणं आजच्या युवकांना कठीण जाऊ नये.

– निरंजन घोडके

## परराष्ट्रीय घडामोडी : पृष्ठ ७ वरून

व्यापार आणि टपालव्यवस्थेची सुरुवात किंवा १९४९ मध्ये एकमेकांपासून दूर झालेल्या कुटुंबांचे पुनर्मीलन घडवून आणणे यासारखे साधेसुधे प्रयोग प्रथम सुरू होतील असे दिसते.

मात्र अमेरिके पाठोपाठ इतर देशांनीही जर तैवानकडे पाठ फिरविली तर तैवानला फारच जड जाईल आणि त्यातच त्याची आर्थिक आघाडी कोसळण्याचा धोका आहे. अमेरिका सोडता आज तैवानचे २१ देशांशी राजनैतिक संबंध आहेत. त्यातील दहाहून जास्त मध्य अमेरिकेतील व लॅटिन अमेरिकेतील देश आहेत. बाकी कोरिया, सौदी अरेबिया, साउथ आफ्रिका, इस्राएल वगैरे देश होत. यातील साउथ आफ्रिका आणि इस्राएल व्यापारी कारणासाठी इतक्यात पाठ फिरवितील असे दिसत नाही.

परंतु प्रमुख धोका असा आहे की, चीनने अजून तैवान सामील करून घेण्याची आशा सोडलेली नाही. तैवानचा पाठिराखा देश अमेरिका त्याला सोडून गेलेला आहे. तेव्हा जी दोलायमान परिस्थिती निर्माण झाली आहे. तिच्यात कोणीही व्यापारी नवीन पैसा गुंतविणार नाही. आपोआपच तैवानची आर्थिक वाढ जात्या वर्षाबरोबर खुंटेल आणि अन्तर्गत असंतोष माजेल. या दरम्यान तैवानशी संबंध तोडणाऱ्या राष्ट्रांची संख्याही वाढत जाईल आणि हळूहळू विस्मरणात पडलेल्या, अन्तर्गत अर्थव्यवस्था कोसळल्याने अस्थिर झालेल्या तैवानला आपल्यात सामील करून घेणे चीनला काही वर्षांनी फारसे जड जाणार नाही. □

**भौतिक समृद्धीचे शिखर गाठूनही समाजाला आपली लय न सापडल्याने इराणमध्ये अराजक माजले आहे. वादळापूर्वीची शांतता सध्या अस्तित्वात आहे; पण रस्तोरस्ती पडलेले मुडदे या शांततेसाठी पडलेले नव्हते.**

**या लय बिघडलेल्या समाजाचे भवितव्य काय ?**

**एक राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विश्लेषण.**

**इराण विशेषांक**

**लवकरच.**

# अधिक उणे आणि संपूर्ण उणे

पृष्ठ ३ वरून

गळाभर पाण्यात दगडी चौरंगावर बसून विष्णुसहस्रनाम जपायचं, अशी घनघोर साधना त्यांनी आचरिली. ते ज्या विहिरीत बसायचे, त्याच विहिरीत गावाचा सध्या पाणवठा आहे. विहिरीच्या तळाशी ठेवलेला दगडी चौरंग अजूनही दिसतो. रंगदासमहाराजांनी समाधी घेतली नाही. 'मी समाधि घेतल्यानंतर कोणी चुकीचे वर्तन माझ्या समाधीपाशी केले, तर न जाणो मी शाप देईन आणि गावाचे नुकसान-वाटोळे होईल!' म्हणून त्यांनी सामान्य माणसाप्रमाणे नैसर्गिक मृत्यूचा मार्ग पत्करला. मृत्यूनंतर त्यांच्या रक्षास्थानापाशी पादुका बसवलेल्या आहेत. दरवर्षी ठराविक तिथीला रंगदासमहाराजांचा उत्सव होतो. या उत्सवाला फार दूर ठिकाणांहून भाविक लोक येतात. पुण्याचे श्री. वि. कृ. श्रोत्रिय येतात, असं समजलं. ते अण्याला शिक्षक होते उत्सवाचं वैशिष्टच म्हणजे आमटी–भाकरीचा प्रसाद वाटला जातो. भाकरी कमालीची रुचकर आणि आमटी तर अशी मसालेदार असते की भोजनोत्तर तीन–तीन दिवस हाताला येणारा मसाल्याचा वास जात नाही म्हणे.

तर या आमटी-भाकरीपासूनच माझ्या गोष्टीला सुरुवात झाली. नगर एस्. टी. ची वाट बघत मी गिरणीशेजारी धुळीत पडलेल्या गर्डरच्या सपाट भागावर (मार्ग–निवाऱ्यात नव्हे!) बसण्याचा प्रयत्न करत बसलो होतो. गावातली तरुणमंडळी एस्. टी. येईतोवर मला कंपनी देत होती. 'रंगदासमहाराजांच्या उत्सवाला शेकडो भाविक येतात, मग त्यांच्या आमटी–भाकरीच्या प्रसादाचा खर्च कोण करतं?' माझ्यामधला किंचित्–अर्थशास्त्रज्ञ प्रश्न विचारतो.

प्रतिक्रियेचा पुरेसा अंदाज मला अर्थातच आलेला नाही; कारण माझ्याभोवतीचे हे तरुण ग्रामवासी मित्र शिकलेले आहेत. शंकर अहिलाजी दातेसारखा बी. एस्सी. (अॅग्री.), बी. एड्., एम्. ए. (फिलॉसॉफी) इतक्या डिग्र्या घेतलेला उत्साही आणि कष्टाळू तरुण शिक्षक या समुदायात आहे, तरी या मित्रवृंदाची मानसिक जडणघडण अस्सल ग्रामीण वळणाची आहे. कमालीच्या आत्मकेंद्री आणि आधुनिक = अश्रद्ध अशा शहरी समीकरणात्मक मनोवृत्तीत वाढलेल्या मला देवाच्या प्रसादाचा खर्च विचारणे ही बाब अत्यंत सामान्य वाटत आहे खरी; पण देवभोळ्या ग्रामीण वातावरणात माझ्या प्रश्नाचा स्वीकार नापसंतिपूर्वक होईल की काय –अशी पुसटशी धास्ती मला वाटतेय.

'उत्सवाचा खर्च अर्थातच आम्ही अणे ग्रामवासी करतो. आम्हाला काही सरकारी ग्रँट, यात्रा–कर वगैरे मिळत नाही!' माझ्या प्रश्नाचं उत्तर विनासंकोच मिळतं मी गप्पच राहतो. माझ्यासमोरच्या सावळ्या वर्णाच्या तरुणाचे ओठ काही तरी सांगण्यासाठी थरथरत आहेत.

'खर्च तरी थोडा-थोडका असतो का? दर घरटी दर पुरुषडोई रोख अकरा रुपये आम्हाला स्वखुशीने द्यावे लागतात.' तो एकदम बोलून जातो.

'स्वखुशीनं–आणि द्यावे लागतात म्हणजे काय?' माझा प्रश्न.

'अहो, खुशी कसली आली आहे? सरळ सरळ सक्तीच म्हणा की. घरात तान्हं पोर जन्माला आलं आणि तो मुलगा असला की, त्याचे अकरा रुपये झालेच लागू. नुसत्या अकरा रुपयांनीच कुठं भागतंय? वर शिवाय पायलीच्या भाकऱ्या बडवून त्या देवळात पोचत्या कराव्या लागतात!' तो फटाक्यांचा सर लागल्यागत फडाफड बोलू लागला

मी सहज हिशेब केला, शंकर दातेंच्या घरी मोठी पाच पुरुषमंडळी आणि एक तान्हा मुलगा म्हणजे सहा माणसांचे सहासष्ट रुपये. दाते दर वर्षी सहासष्ट रुपये भरत होते!

'वर्गणी गोळा करण्याचं काम कोण करतं?' मी विचारलं.

'देवस्थानची पंचमंडळी. या गावचे काही लोक मुंबई–नाशिक–जुन्नर–पुण्याला असतात. त्यांच्याकडेही पंचमंडळी आवर्जून जाऊन वर्गणीच्या पावत्या फाडतात.'

'अस्सं; पण एखाद्या वेळी पैसे उत्सवानंतर उरतही असतील. अशा पैशांचा विनियोग कसा काय होतो?' मी विचारलं.

उत्तरादाखल सावळ्या वर्णाचा तो तरुण छद्मीपणे हसला आणि मग बोलला, 'आम्ही त्या पैशामधून हजारो रुपयांची दगडं आणतो.'

'म्हणजे?' न कळून मी विचारलं.

'अहो, काय सांगायचं कपाळ! वर्गणीच्या पैशांमधून इथे एक ना हजारो लोकोपयोगी योजना होण्यासारख्या आहेत. उदाहरणार्थ, आमच्या गावाला नळयोजना अद्याप नाही. नळयोजनेसाठी सरकारकडे भरावे लागणारे डिपॉझिट देवस्थानच्या वर्गणीमधून सहज भागवता येईल; पण आमच्या या पंचमंडळींनी वर्गणीच्या शिल्लक रकमेचं काय केलं?–तर मुंबईला जाऊन हजारो रुपयांच्या देवादिकांच्या संगमरवरी मूर्ती विकत आणल्या. तसंच देवळाला लोखंडी गेट, सभामंडप, ऑइलपेंट, सजावट यापायी आजपर्यंत आणखी हजारो रुपयांचा असाच चुराडा झालेला असेल!' क्षणाचीही उसंत न घेता तो बोलत होता. स्तिमित होऊन मी ऐकत होतो.

मी अंतर्मुख होऊन विचार करू लागलो. ज्या देशामध्ये दरडोई दैनंदिन उत्पन्न अवघ्या काही आण्यांत असल्याचे कै. डॉ. लोहिया आक्रोश करून सांगत असत, त्या देशात पैशांची ही अनुत्पादक उधळपट्टी राजरोसपणे घडत होती.

भारत हा एक गरीब देश आहे; परंतु पैशांची नासधूस करण्यात येथील गरिबांना मोठी धन्यता वाटते. जिथे जिथे तुम्ही जाल, तिथे तिथे पोट खपाटीला गेलेला एखादा दीनवाणा भिकारी, कंगाल झोपडं आणि पैशांचा यथेच्छ नास केलेलं किमान एक तरी सार्वजनिक काम तुम्हाला दिसलंच पाहिजे.

मी वैजापुराहून औरंगाबादला चाललो होतो. वाटेत माळावर एक साखर कारखाना दिसला म्हटलं, अरे वा! साखर कारखान्यामुळे या भागाचा कायापालटच झाला की! अचानक विचार आला, या ओसाड माळावर कारखान्याच्या पाण्याची सोय कशी काय झाली असेल बुवा? मी बसमधल्या शेजारीप्रवाशाला विचारलं, 'कारखान्यानं एवढ्या पाणी-पुरवठ्यासाठी विहिरी खणल्या

असतील ?'

'छे, छे ! या ओसाड माळावर विहिरांना थवभर पाणी मिळत नाही. कारखान्यानं इथून अकरा मैल लांबीवर गोदावरी नदी आहे, तिचं पाणी पाइपलाइननं आणलंय !'

'नदीच्या जवळपास कारखान्याला जागा मिळत नव्हती का ?' मी विचारलं.

'हात्तिच्या, मिळत होत्या की !'

'मग ?'

'राजकारण !'

राजकारणाची किंमत लाखो रुपये किंमतीची पाइपलाइन होती !

तर गाडी परत अण्याकडे. मी माझ्या मित्रांना विचारलं, 'एवढी नासधूस तुमच्या डोळयांदेखत होत आहे आणि ती नासधूस आहे हे तुम्हाला समजत आहे, तरी तुम्ही गप्प का ?'

माझ्या प्रश्नावर ते सारे गप्पच राहिले. मग त्यांच्यापैकी एक बोलला, 'आमचे हे विचार फक्त आमच्यापुरतेच. व्यवहारात आम्हाला वृद्धांच्या आज्ञेचं जोखड वाळगावंच लागतं. उद्या मी गावात असं काही बोललो आणि मला नुसती ठेच जरी लागली तरी गावातले लोक कुजबुज करू लागतील–पहा, रंगदासमहाराज कोपले म्हणूनच याला ठेच लागली !'

संभाषणामधला जोसच मावळला होता. खेडोपाड्यांत जाऊन संपूर्ण क्रांती पसरवण्याची भाषा करणारे कालचे पोपट आज सोन्याच्या पिंजऱ्यात स्वतःहून बंदिस्त झाले होते आणि आपापल्या मालकांना मिठ्ठू मिठ्ठू करत रिझवत होते.

आणि अणे ? भारताच्या नकाशावर ते होतं तिथंच राहिलं होतं. पुणे ते अणे. अणे ते पुणे. उणे अधिक उणे बरोब्बर पूर्ण उणे, नव्हे –संपूर्ण उणे !

रंगभूमी । शिरीष सहस्रबुद्धे

# जिगर

## – फक्त प्रयोगापुरतीच, लेखनाचं काय ?

**श्री.** यशवंत रांजणकरलिखित 'जिगर' हे अलिकडेच रंगभूमीवर आलेलं एक कौटुंबिक रहस्यप्रधान नाटक. लेखनदृष्ट्या पुष्कळच ढिसाळ. या सामान्य नाटकाची दखल घ्यावीशी वाटते, ती मुख्यतः दोन कारणांमुळे. एक म्हणजे त्याचा बऱ्यापैकी ठाकठीक प्रयोग आणि दुसरं म्हणजे (चांगल्या फार्सप्रमाणेच) आपल्या रंगभूमीवर असलेली, दर्जेदार रहस्यमय नाटकाची जबर उणीव. 'समोरच्या घरात' हे श्री. रत्नाकर मतकरी यांचं एक (साधारणच) रहस्यनाटच अलिकडे पाहिलं होतं. त्यानंतर बहुधा एकदम 'जिगर'च. थिएटर अॅकॅडमीच्या 'खेळिया'चाही उल्लेख इथं करता येईल; पण एक तर ते काही पूर्णपणे रहस्यनाटच नव्हे आणि त्याच्या व्यावसायिक यशाला काही स्वाभाविकच मर्यादा होत्या. अर्थात 'खेळिया' या अनुवादित नाटकात असलेलं एक वैशिष्ट्य 'समोरच्या घरात' किंवा 'जिगर'कडे नाही आणि ते म्हणजे कसदार लेखन. एरवी 'जिगर'ची निर्मिती (संतोषी थिएटर्स + नटेश्वर + चंद्रलेखा प्रकाशित. तिघांनी एकत्र येण्यासारखं या नाटकात काय होतं कुणास ठाऊक !) कमी भपकेबाज किंवा भडक आहे असं नाही. त्यातला पत्रकार राजेश एखाद्या स्मगलर किंवा मंत्रिपुत्राइतका पॉश कपड्यात वावरतो, तर त्यातल्या जुगारसम्राटाची काय कथा ?

या नाटकाचं लेखन कच्चं आहे, स्क्रिप्ट ताकदवान नाही, असं मी म्हणतो, तेव्हा माझा प्रमुख आक्षेप आहे,तो त्यातल्या विस्कळितपणावर. आपल्या कथावस्तूचा पाया लेखकानं एवढा भव्य घेतला आहे, 'कॅनव्हस' एवढा भव्य आहे की, याचा पुढील पसारा पूर्ण लांबीच्या या नाटकात कुठेच त्याच्या आटोक्यात रहात नाही. आटोपशीरपणा, बतशीर रेखीवपणा हे माझ्या मते रहस्यमय (आणि फार्सिकलसुद्धा) नाटकाचे महत्त्वाचे गुणविशेष असायला हवेत. 'जिगर'मध्ये अशी संक्षेपी – साक्षेपी शिस्त नाही. अस्ताव्यस्तपणा – अघळपघळपणा आहे, तो अनेक बाबतीत. डॉक्टर आणि शस्त्रक्रिया या दोन पात्रांची उदाहरणे घ्या. लेखकानं ही पात्रं निर्माण केलीच, तर त्यांना पुरेसं महत्त्वाचं काम (Self-justifying Function) सोपवायला नको का ? कथासूत्रात ती अपरिहार्यपणे गोवली जायला नकोत का ? सदूकाका हे नोकराचं पात्रही तिसऱ्या अंकाच्या पूर्वार्धापर्यंत असंच पारंपरिकरीत्या कथेवर दावून चिकटविल्यासारखं, उपरं वाटतं आणि मग तिसऱ्या अंकाच्या अखेरीस खाडकन् जागा झाल्यासारखा लेखक त्याला एकदम महत्त्व आणून देतो, त्यागमूर्ती वगैरे बनवतो, मग भावनाकल्लोळ इत्यादी. नाटकातली पात्रं ही कथानकाच्या गरजेतून निर्माण व्हायला हवीत की व्यावहारिक सोयी-तडजोडीतून ? सदाशिवला नोकराच्या भूमिकेत हिंदी सिनेमातल्या खानदानी नोकराचा आब आणि रुबाब जो आला आहे, तो श्री. गणेश सोळंकींसारखा अभिनेता त्या भूमिकेत असल्यामुळे (आणि नाटकाचा दिग्दर्शकही असल्यामुळे) असावा असं स्पष्टपणे जाणवतं. एरवी अशा पात्राला इतका वाव मिळता ना एकंदरीतच नाटकातील रहस्य हे शशिमोहन आणि आदिनाथ या सावत्र भावांभोवती इतक्या ठामपणे केंद्रित झालेलं आहे की, बाकीच्या सर्व, विशेषतः उपर्युक्त तीन, पात्रांचं अस्तित्व अत्यंत दूरवर्ती आणि अवाजवी (Peripheral & Superfluous) वाटतं. अशा पात्रांमुळंच आणि त्यांच्यातील प्रसंगांमुळंच दुसरा अंक चांगलाच रेंगाळतो व कंटाळवाणा होतो. नाटकाची एकंदर गतीही (tempo) संथ व

ढिलाईची राहते आणि शशिमोहन व आदिनाथ यांच्या झुंजीनं होणारा नाटकाचा शेवट इतका (abrupt) वाटतो की, अगोदर सैल सोडलेले रहस्याचे अनेक धागे गाफीलच राहून जातात, एकत्र जुळविले ज त नाहीत. शशिमोहनवरील आर्थिक गंडांतर हे एक सदा संदिग्ध प्रकरण याचं उदाहरण म्हणून देता येईल. याखेरीज व्यावसायिक तडजोडीखातर माफक विनोद (उदा. नाटकाच्या सुरुवातीचे पत्रकारविषयक संवाद) थेंबभर प्रेम (उदा. राजेश-नंदा प्रकरण), भरपूर भावप्रक्षोभक (Sentimental) प्रसंग (उदा. शशिमोहन-बेटी नंदा या दरम्यान) आणि कौटुंबिक तणाव इत्यादी जो मालमसाला रांजणकरांनी नाटकात यथायोग्य पेरला आहे तोही काही फारसा सुखद व रहस्यानुकूल प्रकार नव्हे.

'जिगर' चं कथानक प्रामुख्यानं फिरतं ते शशिमोहन ऊर्फ महेंद्रनाथ (बाळ धुरी) या जिगरबाज आणि धनत्तर जुगाऱ्याभोवती. त्याचं बेदरकार धाडस, त्याचं दुर्दैवी पूर्वायुष्य आणि उत्तरायुष्यावर पडलेलं त्याचं सावट, बदमाष सावत्र भावाकडून त्याची होणारी भावनिक-आर्थिक पिळवणूक, त्याचा एक डाव फसून येणारं जबरदस्त आर्थिक अपयश (ज्याचं नक्की स्वरूप अज्ञातच राहतं!) पहिल्या पत्नीचा संशयास्पद मृत्यू आणि जुन्या प्रेयसीशी केलेलं दुसरं लग्न (यांचाही सकारण उलगडा समाधानकारकरीत्या होत नाही.) दुरावलेला सख्खा मुलगा आणि आपली मानून वाढवलेली पोरकी मुलगी यांच्यावरचं व नोकर-मित्रावरचं त्याचं प्रेम आणि बेफाट जिद्दीच्या बळावर अघोरी डाव टाकून शेवटी त्यानं खलनायकावर मिळवलेला विजय ही या व्यक्तिरेखेची अंगोपांगे नाटकाला नायकप्रधान नाटक बनवून टाकतात. हा नायक काहीसा (anti hero) धर्तीचा तर काहीसा अतिमानवी Super-human) आधुनिक हिंदी चित्रनायकासारखा आहे आणि श्री. बाळ धुरी यांनी (काही विशेषत: संवादफेकीतील) अतिरेकी प्रसंग वगळता तो ठीक उभा केलेला आहे. त्याच्या प्रेयसीच्या भूमिकेत विनोदमाला यांनी नाटकीपणाची हद्द गाठून वारंवार रसभंग केला. गणेश सोळंकी यांची दिग्दर्शन व अभिनय या दोहोतली कामगिरी खास नव्हे; पण वाईटही नाही.

आदिनाथाच्या भूमिकेतील कृष्णकांत दळवी यांचा अत्यंत जिवंत आणि सरस अभिनय हा माझ्या दृष्टीनं 'जिगर' मधला एकमेव शुभ लाभ! ☐

चित्रपट । सदानंद बोरसे

# देवकीनंदन गोपाला

## 'सर्वोत्कृष्ट चित्रपट'च्या निमित्ते

'देवकीनंदन गोपाला' या चित्रपटाला महाराष्ट्र शासनाचे १९७८ या वर्षातील सर्वोत्कृष्ट चित्रपटाचे पारितोषिक मिळाले. एका धाडसी प्रयत्नाचे हे यथार्थ कौतुक.

कोणत्याही मोठ्या माणसाच्या जीवनावर कलाकृती निर्माण करायची म्हटली, तर दोन प्रकारच्या शक्यतांनी त्याच्यावर अन्याय होण्याची शक्यता असते. एक म्हणजे त्याच्या जीवनातील, व्यक्तिमत्त्वातील पैलू लहान-खुजे, खुरटे केल्यामुळे त्याचे मोठेपण मारणे आणि दुसरी म्हणजे त्याचे मोठेपणच इतके फुगविणे की, मनुष्यत्वाच्या, पार्थिवतेशी जवळीक असल्याच्या त्याच्या सगळ्या खाणाखुणा पार विस्कटून टाकून, मोडून टाकून एक तेहतीस कोटी एकावा देव तयार करणे. दोन्हीमुळे त्या व्यक्तीच्या खऱ्याखुऱ्या व्यक्तित्वाचा सारखाच खून होतो. या दोन्ही शक्यता टाळून तो माणूस 'माणूस' म्हणून जसा होता, तसा कलाकृतीतून दर्शविण्याचा प्रयत्न करणे अतिशय अवघड असते. कधी-कधी याला त्या कलाकृतीच्या आस्वादकाकडूनही अस्वीकृतिद्वारे अडथळा होण्याचा संभव आणि धोका असतो. त्यामुळे चित्रपट-कृतीसारख्या माध्यमातून जे बहुतांशी प्रेक्षकांच्या प्रतिसादावर अवलंबून असते, अशा माध्यमातून असा माणूस रंगविणे अधिकच अवघड आणि धाडसाचे होऊन बसते. श्री. डॅडी देशमुख यांनी चित्रपटकृतीच्या निर्मितिद्वारे आणि श्री. राजदत्त यांनी तिच्या दिग्दर्शनाद्वारे (राजदत्त या चित्राचे सह-निर्मातेही आहेत.) हे धाडसी पाऊल उचलले. गो. नी. दांडेकरांच्या कथेवरून घेतलेला व गाडगेबाबांच्या जीवनावर आधारित असलेला हा चित्रपट.

लहानपणापासून आलेल्या निरनिराळ्या अनुभवांमधून झालेला डेबू ते गाडगेबाबा हा एका समर्पित जीवनाचा प्रवास घटनांच्या आलेखाच्या रूपाने संपूर्ण चित्रपटामधून आपल्यासमोर येतो. संपूर्ण चित्रपटभर अंशत: जाणवणारा आणि काही ठिकाणी खुपणाराही अनुबोधपटाचा प्रचारकी अभिनिवेश हा दोष मान्य करूनही मला हा आलेख पटला, आवडला. (कदाचित यातील थोडासा भाग त्या व्यक्तिमत्त्वाबद्दच्या आदरातून आला असेल), तो त्याच्या प्रामाणिकपणामुळे आणि त्या व्यक्तिमत्त्वातील अस्सल माणूसपण दाखविण्याच्या धडपडीमुळे. या दोन गुणांमुळेच काही प्रसंगांमध्ये आलेला भडकपणा वा धंदेवाईकपणा (एक–घुसडल्यासारखा वाटणारा तमाशाचा नाच, एक गाणे, गावाचा पाणवठा, एक भिजून गाणे, डेबूजी आपल्या शेताचे रक्षण करीत असताना वापरलेली आधुनिक हाणामारी) अशा दोषांकडे मी दुर्लक्ष केले.

मरीमाईचा नैवेद्य एका अस्पृश्य म्हातारीला देण्याच्या डेबूच्या लहानपणीच्या प्रसंगातून वडिलांचा श्राद्धविधी, सर्व जातींच्या मुलांना एकत्र आणून केला जाणारा गोपाळकाला, कर्जापायी वावरावर आलेली जप्ती, दुष्काळात लोकांचे होणारे हाल, साथीत मरीआईला बोलले गेलेले नवस, मुलाचा मृत्यू आणि स्मशानात झालेली फकिराची भेट (त्या भेटीला 'तो फकीर म्हणजे स्वत:च' असे म्हणून आत्मसाक्षात्काराचे स्पष्टीकरणही देता येईल. त्या भेटीनंतर ऐकू येणाऱ्या वाक्यांमधून अथवा फकिराच्या हसण्यामधूनही चमत्काराचा आभास निर्माण न होता स्वत:ची ओळख डेबूजीला पटल्याचीच अनुभूती येते.) या सर्व प्रसंगांमधून आणि त्यानंतर केलेल्या वणवण प्रवासातील विविध अनुभवांमधून गाडगेबाबांची जगावेगळी रूपे घडतात आणि पुढील चित्रपटा-

मधील प्रसंगांमधून आपल्या डोळ्यांसमोर येतात. समाजसुधारकाचे, समाजसेवकाचे, 'विश्वचि माझे घर' मानून राबणाऱ्या प्रापंचिकाचे, आंधळ्या–पांगळ्यांनाच कुटुंबीय मानून त्यांना आधार ठरलेल्या वटवृक्षासारख्या कर्त्या पुरुषाचे, आपल्या वैयक्तिक कुटुंबाच्या बाबतीतही काळजीवाहू पण निरिच्छ, निर्लोभी संन्याशाचे, जीवनातील अनुभवांच्या मातीत पाय पक्के रोवलेले असल्याने संतांच्या शिकवणुकीतील आभाळभराऱ्या पाहणाऱ्या, दाखविणाऱ्या अशिक्षित तत्त्वज्ञाचे, पैसा पैसा गोळा करून धर्मशाळा, घाट, विद्यालये, अनाथालये, पाणपोया इत्यादींच्या रूपाने जनतेसाठी उदंड दौलत उभी करणाऱ्या श्रीमंत फकिराचे–अशी किती तरी रूपे आपल्यापुढे साकार होतात.

यातील एकेका रूपाची वा गाडगेबाबांच्या व्यक्तिमत्त्वाच्या एकेका वैशिष्टचपूर्ण पैलूची अत्यंत क्रमवार व सुसूत्र प्रसंगांमधून बांधणी केली आहे. उदाहरणार्थ–मनाला न पटणाऱ्या रूढी, परंपरा झुगारून देण्याचा त्यांच्या स्वभावाचा अट्टाहास–१) अस्पृश्य म्हातारीला नैवेद्य देण्याचा पहिलाच प्रसंग. २) मुलांबरोबर म्हटलेले गाणे, त्यात निवडलेला कृष्णाने गोवर्धन उचलण्याचा प्रसंग. ३) सर्व जातींच्या मुलांबरोबर खाल्लेला गोपाळकाला. ४) मुलगी झाल्यानंतर दारू व बकऱ्याचे जेवण देण्यास नकार आणि नंतरचे भारूड. ५) साथीच्या आजारात सगळा गाव मरीमाईच्या पूजेला चालला असताना आपल्या मुलीवर डॉक्टरकडून उपचार करून घेणे. ६) मरीमाईचा धोंडा असा उल्लेख. ७) मार सहन करीत आणि स्वतःला बळेच महार, मांग म्हणवून घेत विहिरीवर पाणी पिणे. ८) पिंडासाठी ठेवलेला भात खाणे. अशा आठ प्रसंगांमधून बांधलेले हे स्वभाववैशिष्टच शेवटी लोकांना हे विचार पटवून देताना आणि त्यांच्याकडून तशी कृती करून घेताना कळसाला पोहोचते. समाजातील दलित घटकांच्या दारिद्र्याची अनुभूती, त्यामागची जाणून घेतलेली कारणे आणि ती दूर करण्यासाठी त्यांची चाललेली धडपड हीही अशीच एक बांधणी. सेवावृत्ती, क्षमाशीलता, निग्रह (आई वारली असतानाही प्रवचन देण्याचा प्रसंग) अशी अनेक स्वभाववैशिष्टचे अशाच प्रसंगांमधून रेखाटली आहेत. या सर्व स्वभाववैशिष्ट्यांमध्ये अथवा रूपांमध्ये म्हणा हवे तर सर्वात एकसंधतेने आणि म्हणूनच प्रभावीपणे व कंगोरेदारपणे समोर येते ते समाजसेवकाचे व प्रचारकचे रूप. पाच प्रवचने, निरनिराळी कार्ये ( धर्मशाळा, विद्यालये, पाणपोया इत्यादि ), विविध प्रसंग ( बायकोने जमा केलेले सर्व सामान वाटून टाकणे, आपल्या नावावर पैसे मिळवून चैन करणाऱ्या मिठू महंताची कानउघाडणी, मृत्युपत्र, 'या गाडग्याचा बुवा, महाराज करू नका.' अशी लोकांना केलेली विनंती ) यांच्यामधून हे रूप सतत ठळक होत राहते.

गाडगेबाबांचे असे रसरशीत व खरे व्यक्तिचित्र सादर करणे हे कौशल्य जितक्या प्रमाणात दिग्दर्शक राजदत्त यांचे आहे, तितक्याच प्रमाणात पडद्यावर गाडगेबाबा म्हणून सामोरे येणाऱ्या डॉ. श्रीराम लागूंचे आहे.

बाबांच्या आयुष्यातील उदात्तता, व्यक्तिमत्त्वातील सगळे पैलू त्यांनी प्रेक्षकांपर्यंत नुसते पोहोचविले नाहीत, तर भिडवले आहेत. तो रंगीबेरंगी चिरगुटे जोडून केलेल्या झग्यातील डोक्यावर खापराचा तुकडा ठेवलेला बाबा पार त्याच्या वऱ्हाडी भाषेपासून, बोलण्यातील हेल काढण्यापासून आपल्यासमोर जिवंत होतो. त्यांच्या भूमिकेचे तोकडे कौतुक मोडक्या-तोडक्या शब्दांमध्ये वाचण्यापेक्षा प्रत्यक्ष पडद्यावर ती पाहिलेलीच उत्तम. डॉक्टरांना या भूमिकेबद्दल सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचे पारितोषिक मिळाले आहे अथवा त्यांची भूमिका नितांत सुंदर झाली आहे, ही बाब आता कौतुक न करण्याएवढी नित्याची व जुनी झाली आहे.

चित्रपटात बाकी कलाकारांची यादी प्रचंड असली, तरी गाडगेबाबांची पत्नी लक्ष्मी (आशा पोतदार), त्यांची (आई), रावसाहेब (रमेश देव) आणि शिष्य मिठू यांशिवाय बाकीच्यांना फारसा वाव नाहीच. या चौघांनीही आपापल्या छोट्या भूमिका व्यवस्थित केल्या आहेत. फक्त चित्रपटाच्या उत्तरार्धात आशाबाईंनी आपले तरुण वय कमी होणार नाही, याची काळजी घेतली आहे. (ही काळजी त्यांच्या दिसण्याच्या बाबतीतही घेतली गेल्याने कदाचित तो दोष त्यांचा न ठरता रंगभूषाकारांचा ठरावा.)

संपूर्ण चित्रपटभर असलेले वऱ्हाडी संवाद हा चित्रपटाचा आणखी एक वैशिष्टचपूर्ण भाग. अर्थ समजण्यात कोणतीही अडचण येत नाहीच; पण वऱ्हाडी हेलकाव्यांच्या बोलण्याने वेगळेपणातून कानाला गोडही वाटले. पटकथा व संवाद कै. ग. दि. माडगूळकरांचे आणि विठ्ठल वाघांचे. पटकथा व संवादाचे पारितोषिक चित्रपटाला आहेच. याच दोघांनी आणि डॅडी देशमुखांनी गीतांचा भार उचलला होता. 'छन्नीहातोडचाचा घाव करी दगडाचा देव। खाई दैवाचे तडाखे त्याला माणूस हे नाव॥' आणि 'विठ्ठलाच्या पायी थरारली वीट' ही दोन गीते अप्रतीम, ती बहुधा गदिमांची असावीत. (चूकभूल द्यावी-घ्यावी.)

संगीत राम कदम यांचे, तर पार्श्वसंगीत दत्ता डावजेकरांचे. चित्रपटात प्रवचने, गाडीवरून फिरत्या सभा ते थेट शेवटच्या अंत्ययात्रेपर्यंत बहुतेक समूहदृश्यांमध्ये एक वास्तवतेचे (अंत्ययात्रेच्या मिरवणुकीत तर नको इतक्या वास्तवतेचे) भान ठेवलेले आहे. तेच समूह-नामोच्चाराच्या प्रसंगी ठेवले आहे. कोठेही सुरेलपणाचा हट्ट न बाळगता समूहाकडूनच 'गोपाला, गोपाला, देवकीनंदन गोपाला' म्हणवून घेऊन त्याला मागे मृदंगाचा दिलेला ताल उल्लेखनीय.

तर असा हा एका आगळ्या विषयावरील वेगळा प्रयत्न. या वर्षीच्या सर्व मराठी चित्रपटांमध्ये 'जैत रे जैत' प्रमाणेच त्याच्या सर्व गुणदोषांसकट त्याचे वेगळेपण टिकून राहते.

रंगभूमी : मुक्काम मुंबई

# अपेक्षित उंची न गाठलेली केशवराव दाते व्याख्यानमाला

विनया खडपेकर

दरवर्षीप्रमाणे मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात 'केशवराव दाते व्याख्यानमाला' दिनांक २७ डिसेंबर १९७८ ते १ जानेवारी १९७९ पर्यंत सादर झाली. या व्याख्यानमालेचे संयोजन ग्रंथसंग्रहालयातील नाटयशिबिर–संचालिका सौ. कुमुद चासकर यांनी केले होते. 'रंगभूमी 'वर विविध बाजूंनी विचार व्हावा अशा प्रकारे विषयांची आणि वक्त्यांची निवड सौ. चासकर यांनी केली होती.

व्याख्यानमालेचे पहिले पुष्प डॉ. श्रीराम लागू यांनी गुंफले. त्यांचा विषय होता 'प्रायोगिक रंगभूमी.' कै. केशवराव दाते यांच्या स्मरणाने श्री. श्रीराम लागू यांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली. प्रायोगिक नाटक कशाला म्हणायचे? १८४३ साली विष्णुदास भाव्यांचे नाटक, १८८० मध्ये किर्लोस्करांचे 'शाकुंतल', १९२३ मध्ये 'आंधळ्यांची शाळा', १९५७ मध्ये 'वेड्याचे घर उन्हात' ही नाटके प्रायोगिक होती. आज ही नाटके प्रायोगिक आहेत असे कोणी म्हणणार नाही. कालचे प्रायोगिक ही आजची चाकोरी होते. प्रस्थापित चाकोरीच्या बाहेर जाऊन काही वेगळे करणे म्हणजे प्रायोगिक. प्रायोगिक रंगमंच असा काही वेगळा पंथ असू शकत नाही. प्रयोगशाळेत कच्चा माल असतो. प्रक्रिया यशस्वी झाली की तो उचलून बाजारात आणायचा; पण आजकाल प्रायोगिक नाटक ही फॅशन झाली आहे. ती करणाऱ्यांचे आशयाकडे लक्ष नसते. नाटकाच्या फॉर्ममध्ये सगळे गुंतले आहेत. त्यांना कळकळ आहे, काही सोसण्याची तयारी आहे; परंतु त्यांच्या ठिकाणी परिश्रम, चौफेर विचार, व्यासंग आढळत नाही. व्यावसायिक एका चाकोरीत फिरतात. प्रायोगिकवाले दुसऱ्या चाकोरीत फिरतात. तरीही प्रायोगिक चळवळ सुरू पाहिजे. त्याशिवाय रंगभूमीचे डबके होईल रंगभूमीच्या विकासाची किंवा ऱ्हासाची जबाबदारी प्रायोगिक नाटकांवर पडते, असे विचार श्री. श्रीराम लागू यांनी मांडले. आपले अनेक अनुभव सांगत श्री. लागू यांनी आपले विचार व्यक्त केले. त्यांची रंगभूमीविषयीची कळकळ त्यांच्या भाषणात पूर्णपणे प्रतीत होत होती. विषय रुक्ष असूनही त्यांनी तो अतिशय सोपा केला.

२९ डिसेंबर १९७८ रोजी दूरदर्शन–'सप्रेम नमस्कार'–प्रसिद्ध श्री. विश्वास मेहेंदळे यांचे भाषण झाले. त्यांचा विषय होता, 'दूरदर्शनावरील अभिनय.' या विषयावर ते काहीच बोलले नाहीत. दूरचित्रवाणी हे एक गुंतागुंतीचे माध्यम आहे. कम्युनिकेशन म्हणजे काय? चित्रकला, नृत्य, कविता, कादंबरी, नाटक यांतून कम्युनिकेशन कसेकसे साधले जाते, आमचे नाटक प्रेमत्रिकोणापलीकडे जात नाही, पॉल सार्त्र यांची नाटके केली जातात; पण हरिजन स्त्रियांवरचे अत्याचार आमच्या नाटकांचा विषय होऊ शकत नाहीत, असे बरेच काही-बाही थोड्याफार विनोदी शैलीत बोलून श्री. मेहेंदळे यांनी व्याख्यानाला नेमून दिलेला वेळ काढला. शेवटी 'दूरदर्शनावरील अभिनय' या विषयावर मी मुद्दामच बोललो नाही असे सांगून ते मोकळे झाले. कारण त्यांचे त्यांनाच माहिती.

व्याख्यानमालेतील तिसरे व्याख्यान श्री. एस्. पी. निंबाळकर यांचे होते. विषय 'नाटक आणि योगासन.' श्री निंबाळकर यांचे भाषणही विषयाला पूर्णपणे धरून होते असे म्हणता येणार नाही. तथापि त्यांनी विषयाच्या अनुरोधाने जाण्याचा प्रयत्न केला. प्रारंभीच ते म्हणाले, 'नाटक आणि योगासन' ही विचित्र शय्यासोबत आहे. शाळा, हॉस्पिटल यांच्यांशी जसा योगाचा संबंध आहे, तसा नाटकाशी योगाचा संबंध नाही. शिवांनी पार्वतीला योगाचे धडे दिले. त्याला योगिराज म्हणतात. शिवांनीच नाटयशास्त्र सुरू केले म्हणून त्याला नटराज म्हणतात. त्या अर्थी या दोन्हींचा परस्पर संबंध असावा असे सांगून श्री. निंबाळकर यांनी योग व योगासन याविषयी भरपूर माहिती सांगितली. बालगंधर्व, मेन्युहिन योगसाधना करीत असत असेही ते म्हणाले. त्यांच्या विद्यार्थ्यांनी योगासनांची प्रात्यक्षिके करून दाखविली. योगासनांवरील दृढ विश्वास, योगसाधनेचे प्रेम श्री. निंबाळकर यांच्या शब्दाशब्दांतून व्यक्त होत होते.

दिनांक ३१ डिसेंबर १९७८ चे श्री. शं. ना. नवरे यांचे भाषण म्हणजे समोरच्या श्रोत्यांशी मनमोकळी बातचीत होती. त्यांचा विषय होता 'नाटयलेखन : एक प्रपंच.' नाटक लिहिताना कोणत्या अडचणी येतात, कोणती प्रक्रिया घडते, नाटक रंगमंचावर येताना लेखकाच्या जिवाची काय उलघाल होते आणि एकंदर नाटकाचा प्रपंच कसा हे श्री. शं. ना. नवरे यांनी मनोरंजकपणे सांगितले. नाटकाचा प्रपंच मांडतानाचे अनुभव सांगितले. मनातली पात्रे ओळखीची झाली की ती लेखकाशी बोलायला लागतात.

म्हणतात, तू लिही. मग नाटकाची सुरुवात होते. ही प्रक्रिया झाली नाही तर सर्वच पात्रांच्या तोंडांनी लेखक बोलायला लागतो. दिग्दर्शकाशी चर्चा ही नाटकात अगदी आवश्यक आहे. कधीकधी दिग्दर्शक लेखकाच्या पुढे जातो. नाटक लिहिताना पात्रांची नावे, त्यांची एकमेकांची प्रेक्षकांना सहज कळतील याची काळजी घ्यावी लागते. प्रत्येक एन्ट्री, एक्सिट आवश्यक वाटली पाहिजे. एखाद्या पात्राला कपडे बदलून यायचे असेल तर तेवढा अवसर मिळतो आहे की नाही हे लक्षात घ्यावे लागते. अशा बारीकसारीक अनेक गोष्टी. एकंदर श्री. शं. ना. नवरे यांच्या शब्दात, नाटकलेखनापासून पहिला प्रयोग पार पडेपर्यंतचा अनुभव घेतला म्हणजे प्रसूति झाली की काय असं वाटतं याचा अंदाज येऊ शकतो. श्री. शं. ना. नवरे यांना श्रोत्यांनी अनेक प्रश्न विचारल्यामुळे कार्यक्रमाची रंगत वाढली.


दिनांक १ जानेवारी १९७९ चे शेवटचे श्री. दीनानाथ टाकळकर यांचे व्याख्यान अगदीच उथळ वाटले. त्यांचा विषय होता, 'नाटकात मी कसा बोलतो ?' 'मी विषय नीट समजावून घेतला आहे' असे त्यांनी प्रारंभी सांगितले त्याची प्रतिती पुढच्या व्याख्यानात आली नाही. 'त्याने ते तसे करायला हवे होते' ही भाषा पुस्तकी झाली. नाटकात ती तशी बोलून चालणार नाही. "त्यांनी तसं करायला हवं होतं" असं बोलायला पाहिजे. "तुझ्या आईला सांग" हे झटकन् घाईने उच्चारले तर काय होईल. "तुझ्या-यला सांग." अशा प्रकारची प्राथमिक माहिती त्यांनी सांगितली. नंतर शाळकरी मुली भाषण कसे करतात, 'रिमझिम पाउस पडे सारखा' गाणे कसे म्हणतात त्या नकला करून दाखविल्या. त्या नकला पाहून वाटले श्री. टाकळकर यांनी मुद्दाम शाळेत जाऊन हल्लीची मुले कशी बोलतात, कशी गातात, स्टेजवर कशी वावरतात हे पहावे. "रिमझिम पाउस"च्या जमान्याइतकी ती अपरिपक्व, बावळट खासच नाहीत. त्याच त्याच नकला किती दिवस गिरवायच्या ? श्री. टाकळकर बोलताना म्हणाले, लिखाण बदलले, कथावस्तु बदलल्या. नट मात्र पारंपारिकच. खरंच आहे ते ! श्री. टाकळकरांनी आपल्या नकलांनी ते पारंपारिकपण सिद्ध केले.

पाच दिवसांच्या या व्याख्यानमालेत उत्कृष्ट विचक्षण व्याख्यान ऐकल्याचे समाधान एकही दिवस लाभले नाही; पण पूर्णपणे विषयाला धरून बोलले असे फक्त डॉ. लागूच. श्री. शं. ना. नवरे नाटकप्रपंचाविषयी जे जे स्वतःला जाणवले ते श्रोत्यांना हौशीने ऐकवत होते तरी 'ब्लड नॉट'ची कथा सांगत मुख्य विषयापासून ते खूप दूर गेले. पुष्कळसे उत्तम चित्रपट, नाटके दूरदर्शनावर परिणामकारक होऊ शकत नाहीत. त्या अर्थी 'दूरदर्शन-अभिनय' काही तरी वेगळी चीज आहे. त्यासंबंधी काही ऐकायला मिळेल असे वाटले होते. ती अपेक्षा विश्वास मेहेंदळे यांनी अगदीच फोल ठरविली. श्री. निंबाळकरांनी विषयाच्या अनुरोधाने जाण्याचा प्रयत्न केला; पण ते तितकेसे जमले नाही. तीस-पस्तीस वर्षे रंगभूमीवर काढलेल्या श्री. टाकळकरांनी रंगभूमीविषयी काही शब्द उच्चारून बाकीचा वेळ नकलातच घालविला !

एकंदर ही व्याख्यानमाला अपेक्षित उंची गाठू शकली नाही. □


## हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?
## राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?

या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी........



# नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर

आवृत्ती : तिसरी (सचित्र)

किंमत : रुपये पंचेचाळीस

राजहंस प्रकाशन, पुणे

# अनपढ़

## भारतीय नारीचा, आर्य पतिव्रतेचा जयजयकार असो !

'आपने सुना, सारिका की शादी हो रही है ?'

'किससे ? परीक्षित सहानीसे ?'

'नहीं।'

'विजयेंद्रसे ?'

'नहीं। अशोककुमार से।'

अशी जाहिरात ऐकल्यानंतर आणि 'अनपढ' हे नाव वाचल्यानंतर अशिक्षितपणा, जरठ बालाविवाह वा तत्सम समस्येवरील चित्रपट असावा, असे वाटत होते; पण पहिल्या दहा मिनिटांत त्याचा पठडीबाजपणा ध्यानात आला.

मुकेश हा तरुण केवळ ती 'अनपढ, गँवार' म्हणून आपल्या पत्नीला लग्नानंतर सोडून जातो. अखेर अनेक संकटांवर मात करून आणि भारतीय नारित्वाचे, आर्य पातिव्रत्याचे अनेक अंगभूत चमत्कार दाखवून त्याची पत्नी त्याला एकपत्नीव्रती बनविते आणि सन्मार्गावर आणते, अशी ही कथा.

कथा कोणतीही असो, त्यात दोन-चार प्रेमाचे त्रिकोण-चौकोन घातल्याशिवाय आपल्याकडे चित्रपट पूर्ण झाल्यासारखा वाटतच नसावा. अनपढमध्येही डॉ. आनंद (परीक्षित सहानी), ज्योती (झरीना वहाब), मुकेश (विजयेंद्र) हा खरा त्रिकोण आणि डॉ. गुप्ता (अशोककुमार), गीता (सारिका), मुकेश हा लिंबू-टिंबू त्रिकोण आहेच. हल्लीहल्ली काही तरी धक्कादायक दाखवून प्रेक्षकांची फिरकी ताणण्याच्या उद्योगात हे चित्रपटवाले फार असतात. अनपढमध्येही अशोककुमार व सारिकाचे होऊ घातलेले लग्न ही अशीच मोठी फिरकी; पण त्या दिशेने चित्रपटाचा प्रवास सुरू होताच सूज्ञ प्रेक्षक 'आता हे लग्न होणे शक्य नाही', हे ओळखून बसतो. याच धर्तीवरील छोट्या फिरक्या तर खूपच- उदा.- अशोककुमार बागेत झाडांना पाणी घालीत असताना आशा पारेख येऊन त्याचा गळा धरते आणि किंचाळते, 'तू-तू मारलंस माझ्या मुलाला ! दे परत माझा मुलगा !' अशोककुमार ताडकन् तिच्या तोंडावर पाण्याचा फवारा मारतो. (इथे प्रेक्षकाला 'काय दुष्ट माणूस आहे हा !' असे वाटावे, अशी अपेक्षा.) मग तो स्पष्टीकरण देतो, 'हॅं: हॅं:, ही शॉक ट्रीटमेंट बरं.' (इथे ही छोटी फिरकी पूर्ण होते.) अशोककुमार-सारिकाचे तथाकथित प्रणयप्रसंग याही अशाच वाया गेलेल्या फिरक्या.

एक अशोककुमारचा व दोन देवन वर्मा हे अपवाद वगळता बाकीच्यांचा अभिनय शून्य किंवा एक. म्हणजे बदल नामक प्रकारच नाही. परीक्षित सहानी कायम 'अवघ्या विश्वाची चिंता माझिया खांद्यावरी'च्या चेहऱ्याने तर सारिका सतत 'कळेना अजुनी माझे मला, असा मी काय गुन्हा केला'च्या थाटात रडत डोळे सुजवणार. विजयेंद्र म्हणजे छद्म-अमिताभ बच्चन आहे. उंची या एकमेव समाईक गुणधर्माचा गैरफायदा घेऊन हा इसम सगळीकडे अमिताभच्या स्टायली मारायचा प्रयत्न करतो; त्यामुळे चित्रपटातील विनोदाचा सगळा भार त्यानेच उचलला आहे. साहजिकच विनोदासाठी आयात केलेली अरुणा इराणी, मीना टी. ही माणसे उपरीच वाटायला लागतात.

दिग्दर्शक एस्. एम्. सागरसाहेबांनी संपूर्ण चित्रपटाची पठडी आवळली असली तरी हा पठडीबाजपणाही त्यांना नीटसपणे दाखविता आला नाही. पार्टीचं दृश्य खरं तर हिंदी चित्रपटातील सवयीचं व सोयीचं; पण अनपढमध्ये बारा बाय वीसच्या खोलीत हजारो जणांना कोंबून अन् नाचवून घेतलेले पार्टीचं दृश्यसुद्धा नकोसं होतं. तीच गोष्ट चित्रपटातील सर्व प्रेमगीतांची. चित्रपटाच्या शेवटी-आपली मनधरणी करण्यास आलेल्या मुकेशची गीता निर्भर्त्सना करते व त्याला पती म्हणून स्वीकारण्यास स्वच्छ नकार देते-हा प्रसंग पाहून मी उगाचच काही वेगळे पाहायला मिळणार की काय, या विचाराने थोडा सावरून बसलो 'पती हाच परमेश्वर!' या आपल्या परमपूज्य, आदरणीय, प्राचीन कल्पनेला ही उद्धट स्त्री आता धक्का लावणार की काय ? पण नाही; अशोककुमार ऐनवेळी तिच्यातील भारतीय नारीला जागृत करतो, नव्या पिढीवर टीकास्त्र सोडतो आणि ही साठा उत्तरांची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण होते. माझ्या मनातील सागरसाहेबांबद्दलचा निर्माण होऊ घातलेला अनादर तत्काळ लोप पावला आणि त्यांनी केलेल्या या संस्कृतिरक्षणाचे कौतुक वाटू लागले.

चित्रपटाचे संगीतकार आहेत हेमंत भोसले. चित्रपटातील चारी गाणी ठीक. 'ए जी कहो क्या हाल है ?' हे किशोर व आशाचे द्वंद्वगीत शब्द, स्वर व सूर या तिन्ही बाबतीत 'चलती का नाम गाडी' मधील 'हाल कैसा है जनाब का'ला अत्यंत समांतर, पण डाव्या बाजूला समांतर गीतकार मजरूह सुलतानपुरी म्हणजे नेहमीप्रमाणेच फटाफट गीते !

एकूणच 'बदलते रिश्ते' काय किंवा 'अनपढ' काय, सिनेमावाल्यांचा भारतीय स्त्रीबद्दलचा आदर वाढीस लागलेला दिसतोय. □

### खुलासा

दि. ३० डिसेंबरच्या 'माणूस'मध्ये 'घटश्राद्ध'वरील लेखात 'चोमना दुडी'ची कथा अनंतमूर्तींची असल्याचा आलेला उल्लेख चुकीचा असून ती कथा या वर्षीचे ज्ञानपीठ-विजेते डॉ. के. शिवराम कारंथ यांची आहे.